# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## कोविड-१९ चा मुकाबला करणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(१) १२९८७ (१०-०९-२०२०). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ च्या संसर्गाच्या काळात वैद्यकीय सुविधा देणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले नसून डॉक्टरांना राहण्यासाठी चांगल्या सुविधा नसल्याची दखल मा.सर्वोच्च न्यायालयाने घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा डॉक्टरांना तातडीने वेतन देऊन त्यांना राहण्याची व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) डॉक्टर्स व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना चांगल्या सुविधा देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना आदेश दिले आहेत.

(२) महाराष्ट्र राज्यामध्ये डॉक्टरांना वेतन देण्यात येते व संपूर्ण लॉकडाऊन असल्यास राहण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सुशिक्षित बेरोजगार सेवा सोसायटीच्या मागण्यांबाबत

**(२) ५५५६७ (२१-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुशिक्षित बेरोजगार सेवा सोसायटीच्या विविध मागण्यांबाबत बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचे प्रतिनिधी व कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९.१०.२०२१ रोजी वा त्यासुमारास बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत आयुक्तांनी मजूर सहकारी संस्थांच्या धर्तीवर विना निविदा १० लाखांपर्यंतची कामे स्वयंरोजगार सेवा संस्थांना देण्याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही सुरू असल्याचे आश्वासित केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्थांना एमआरईजीएस अंतर्गत कामे वाटप व्हावीत तसेच काम वाटप समितीचे अध्यक्ष सीईओ ऐवजी डी.डी.आर. असावेत या व अन्य मागण्या आश्वासित करून देखील अद्यापही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१८-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

एमआरईजीएस अंतर्गत कामे वाटप हा विषय ग्रामविकास विभागाशी संबंधित असल्याने त्याबाबत सदर विभागाकडे विनंती करण्यात यावी, असे दि. २१.१०.२०२१ रोजी पार पडलेल्या बैठकीत आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींना सूचित केले आहे. तसेच, विभागाच्या दि. ०१.०२.२००६ च्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे बेरोजगार सेवा संस्थांना करावयाच्या काम वाटप समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) हेच राहतील, असे देखील सदर बैठकीत बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींना सूचित केले आहे.

(४) बेरोजगारांच्या सेवा सहकारी सोसायट्यांकरीता विना निविदा कामाच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय आरोग्य अभियानातील वैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत

**(३) ५५७६३ (१८-०१-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील वैद्यकीय अधिकारी (MBBS) यांच्याप्रमाणे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (BAMS) यांना वेतन देण्याबाबत औसा विधानसभाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यात सदरील वैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनात वाढ करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) दिनांक १९.१२.२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.
(२) हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वेगवेगळया कार्यक्रमातील विविध पदांचे कामाचे स्वरूप व शैक्षणिक अर्हता, किमान वेतन कायद्यानूसार द्यावयाचे वेतन इ. बाबी विचारात घेऊन वेतन सुसुत्रीकरण प्रक्रियेस केंद्र शासनाकडून सन २०२०-२१ मध्ये मान्यता देण्यात आली असून सदर वेतन सुसूत्रीकरणानूसार वैद्यकीय अधिकारी आयुष (UG) यांचे रू.२८०००/- व वैद्यकीय अधिकारी आयुष (PG) रू.३००००/- प्रतिमाह मानधन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन एच एम) अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्तीबाबत

**(४) ५८९८१ (२८-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन एच एम) अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या दरवर्षी ११ महिन्यांनंतर पुर्ननियुक्ती करावी लगत असून सदर पुनर्नियुक्ती करण्यासंदर्भातली नस्ती शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत ८०० एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याचे प्रस्ताव जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत शासनाकडे सादर केले असून प्रत्यक्षात सदर नियुक्तीचे प्रस्ताव देखील प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन एच एम) अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुनर्नियुक्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही. पुनर्नियुक्तीचे प्रस्ताव शासनस्तरावर येत नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येणारे वेतन समान काम समान वेतन कायद्याप्रमाणे राष्ट्रीय बाल स्वाथ्य कार्यक्रमातील कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना देण्याबाबत**

**(५) ५९६९६ (२८-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येणारे वेतन समान काम समान वेतन कायद्याप्रमाणे राष्ट्रीय बाल स्वाथ्य कार्यक्रमातील कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक १८ नाव्हेबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने नैनीताल येथे दाखल केलेल्या WRIT Petition No ४८४ of २०१४ (S/B) याचिकेमध्ये राष्टीय आरोग्य अभियान मधील कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना समान वेतन देण्याचा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने उत्तराखंड राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात SPECIAL LEAVE PF APPEAC (C) No (s) ३३६४५/२०१८ च्या अपिलावर मा.उच्च न्यायालय नैनिताल यांचा निर्णय अबाधित ठेवण्यात आला असून राष्ट्रीय आरोग्य अभियान मधील सर्व आयुष कंत्राटी बाल स्वास्थ कार्यक्रमातील वैद्यकीय यांना कंत्राटी MBBS (वै.अ.) यांच्या प्रमाणे मानधन देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने या वैद्यकीय अधिकारी यांना समान काम समान वेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १४.११.२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने उत्तराखंड सरकारला उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मुभा दिली आहे.

(४) एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी यांची शैक्षणिक अर्हता, कर्तव्य व जबाबदा-या ह्या आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांपेक्षा वेगळया आहेत. त्यामुळे समान काम समान वेतन देणे लागू होत नाही. तसेच मा.उच्च न्यायालयाचा निर्णय हा उत्तराखंड राज्याशी संबंधित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात अत्याधुनिक जलतरण तलाव उभारणेबाबत**

**(६) ६१३९७ (२७-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरला ऐतिहासिक कुस्तीचे माहेरघर म्हणून ओळखले जाते, शहरातील वातावरण हे सर्वच खेळाडूंना पोषक असल्याने देशातून विविध खेळाडू, क्रीडाप्रेमी हे सराव करण्यासाठी याठिकाणी येतात कोल्हापूरने अनेक खेळाडू घडविले असून त्यांनी राज्य व देशाचे प्रतिनिधित्व करून सुवर्ण पदका पर्यंत मजल मारली आहे, परंतु जलतरण खेळाडूसांठी कोल्हापूर शहरात अत्याधुनिक जलतरण तलाव नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कोल्हापूर शहरामध्ये सुसज्ज असे अत्याधुनिक जलतरण तलाव उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व क्रीडा प्रेमींची असल्याने जलतरण तलाव उभारणीसाठी शासनाकडून निधीची तरतूद केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जलतरण तलाव उभारण्यास मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२९-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

छत्रपती शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर येथे जलतरण तलाव सुरु आहे.

(२) व (३) विभागीय क्रीडा संकुल कोल्हापूर येथे जलतरण तलावाची उभारणी केलेली आहे. परंतु तांत्रिक अडचणीमुळे जलतरण तलाव सद्य:स्थितीत बंद आहे. त्यामुळे अद्ययावत जलतरण तलाव उभारणीची मागणी लोकप्रतिनिधींकडून होत आहे. शेंडा पार्क येथील जागेची मागणी जिल्हा क्रीडा अधिकारी, कोल्हापूर यांनी केली असून सदर जागेवर जिल्हा क्रीडा संकुल, कोल्हापूर उभारणी करण्याचे प्रस्तावित असून या जागेवर विविध खेळाची मैदाने व अत्याधुनिक जलतरण तलावासह क्रीडा संकुल उभारणीची पुढील कार्यवाही करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी येथील शाळेतील आर्थिक व्यवहार व अनियमितता प्रकरणी तत्कालिन मुख्याध्यापकाची चौकशी करण्याबाबत**

**(७) ६२७८१ (०३-०५-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाबळेवाडी शिक्रापुर (ता.शिरुर, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळात विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी तत्कालिन मुख्याध्यापकाकडून शाळा सुधार निधीच्या नावाखाली देणगी घेतली जात होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपन्यांनी सामाजिक दायित्व व स्वयंसेवी संस्था यांनी किती रक्कम आणि कधीपासून शाळेस दिली जात होती त्या रकमेचा विनियोग कशासाठी केला गेला, याबाबत जिल्हा परिषद पुणे यांनी चौकशी समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशी समितीने शाळेचे तत्कालिन मुख्याध्यापक यांचे वैयक्तिक बँक खाते आणि शाळा व्यवस्थापन समितीचे बँक खाते व वैयक्तिक बँक खात्यांची तपासणी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर तपासणीत तत्कालिन मुख्याध्यापकावर आर्थिक गैरव्यवहार अथवा अनियमितेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) तत्कालीन मुख्याध्यापक यांना अनियमिततेबाबत निलंबित करुन त्यांचेविरुद्ध खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लि. या कंपनीने प्रकल्प उभारणीसाठी कोकणातील समुद्रकिनारी सुमारे ५ हजार हेक्टर जमिनीची मागणी केल्याबाबत

**(८) ६४६९३ (२८-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लि. या कंपनीने प्रकल्प उभारणीसाठी कोकणातील समुद्रकिनारी सुमारे ५ हजार हेक्टरची मागणी दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी एकूण किती गुंतवणूक करण्यात येणार आहे व एकूण किती रोजगार निर्मिती होणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अर्सेनल मित्तल निप्पॉन स्टील या कंपनीने एप्रिल,२०२३च्या दरम्यान मऔवि महामंडळाकडे Integrated Steel plant (SP) साठी ५००० एकर जमीन व Downstream Project साठी १००० एकर जमिनीची मागणी केली होती. त्यानुसार कंपनीचे प्रतिनिधी, मऔवि महामंडळ व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे अधिकारी यांची दि.१०.०४.२०२३ व दि.२८.०४.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे दि.२३.०५.२०२३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील वाटद व रीळ या ठिकाणी व दि.२४.०५.२०२३ रोजी विजयदुर्ग (गिर्ये) या ठिकाणी कंपनी प्रतिनिधी तसेच मऔवि महामंडळ व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे अधिकारी यांनी स्थळ पाहणी केली.

उक्त कंपनीने दोन्ही ठिकाणच्या भौगोलिक परिस्थिती व सोयी सुविधांबाबतची माहिती मागविली होती. त्याप्रमाणे कंपनीस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तद्नंतर दि.०६ व ०७ जून, २०२३ रोजी कंपनीच्या Technical team ने मऔवि महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत पुन:श्च स्थळपाहणी केली व त्यांनी पायाभूत सुविधांबाबतची माहिती मागविली. त्यानुसार दि.०५.०७.२०२३ रोजी सदर माहिती मऔवि महामंडळाकडून कंपनीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(२) प्रस्तावित प्रकल्पात होणारी गुंतवणूक व रोजगार निर्मिती याबाबतची माहिती संबंधित कंपनीने मऔवि महामंडळास सादर केलेली नाही.
(३) सदर प्रकल्पाबाबत महामंडळाच्या स्तरावर संबंधित कंपनीकडे सतत पाठपुरावा सुरु आहे. तथापि, प्रस्तावित प्रकल्पाबाबत संबंधित कंपनीकडून मऔवि महामंडळास अद्याप कोणताही परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे सुसज्ज क्रीडांगण उभारण्याबाबत

**(९) ६६१४८ (२३-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) शहरात युवा खेळाडूंना अत्यावश्यक असलेले सार्वजनिक क्रीडांगण नसल्याने तसेच क्रीडांच्या सरावापासून वंचित राहावे लागत असल्याने खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथील क्रीडापटूंना प्रोत्साहन देणेबाबत सार्वजनिक क्रीडांगण तयार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२८-०२-२०२४) :** (१) नाही.

(२) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) तालुका क्रीडा संकुलासाठी मौ. सतारे येथील सर्वे नं.३९ मधील ०२ हेक्टर ४० आर जागेवर क्रीडा संकुलाची निर्मिती करण्यात येत आहे. या संकुलाच्या रु.८९५.१७ लक्ष अंदाजपत्रकास दि. २८.४.२०२१ रोजी मान्यता देऊन रु. ८६१.८७ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. येथे २०० मी. धावनपथ, जलतरण तलाव, मल्टीपर्पज हॉल, विविध खेळांचे मैदाने-कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, संरक्षण भिंत इ. सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सबंधित संकुल समितीच्या माध्यमातून संकुलाचे बांधकाम करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील एलफिस्टन तांत्रिक महाविद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत

**(१०) ६६६२३ (२५-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय मुंबई ही २०० वर्षे जुनी असलेली नामांकित शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्यामुळे या विद्यालयाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय माजी विद्यार्थी उत्कर्ष समितीने व लोकप्रतिनिधी यांनी दि. ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री शालेय शिक्षण व मा.मंत्री कौशल्य विकास यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयात नवीन प्रवेश प्रक्रिया बंद करण्यात आली असून इमारतीमध्ये शासकीय कार्यालये सुरु करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय इमारतीमधील बहुतांश भागामध्ये इतर शासकीय कार्यालयांनी अतिक्रमण केल्यामुळे शाळेच्या वापराकरिता अतिशय थोडी जागा शिल्लक असल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार एल्फिन्स्टन टेक्निकल स्कूल इमारतीमधील इतर कार्यालये दुसरीकडे स्थलांतरीत करून या नामांकित शाळेला गतवैभव मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०७-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय येथे पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमात इ. ९ वी मधील ३३ विद्यार्थी व इ. १० मधील ३८ विद्यार्थी शिकत असून + २ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया संस्था स्तरावर सुरु आहे. सबब, नवीन प्रवेश प्रक्रिया बंद करण्यात आलेली नाही.

(३) हे खरे नाही. एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या जागेमध्ये इतर विभागांची ८ शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. मात्र एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुरेशी जागा उपलब्ध असून विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, ही बाब खरी नाही.

(४) विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने काळानुरुप औद्योगिक आस्थापनांना गरज असणाऱ्या तांत्रिक कौशल्याबाबतचे कौशल्य विद्यापीठाअंतर्गत नवीन तंत्रज्ञानावर आधारीत अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. विभागांतर्गत ८ वी ते पदवीपर्यंतचे तांत्रिक अभ्यासक्रम सुरु करण्यात येवून त्याव्दारे मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच अद्ययावत अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण मिळण्याच्या दृष्टीने सदर महाविद्यालयात कौशल्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयात कार्यरत ८ शासकीय कार्यालय कुलाबा मतदार संघ निवडणूक कार्यालय, शासकीय अध्यापक महाविद्यालय, राज्य मराठी भाषा विकास संस्था यांचे कार्यालय स्थलांतर करणेबद्दल संबंधित विभागाला जागा रिक्त करण्याबाबत विनंती केली असून पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवीची इमारत पूर्णत्वाकडे असून संस्था लवकरच नवीन जागेत स्थलांतरीत होणार आहे. तसेच कौशल्य विद्यापीठाला औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल येथे इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. संस्थेच्या विकासासाठी व इमारतीच्या परिसराचे जतन व संवर्धन तसेच सुशोभिकरण करण्यासाठी एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या मुख्य इमारतीची हेरिटेज इमारती अंतर्गत (टप्पा-१) जिर्णोद्धार व इमारत सुशोभिकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) तालुक्यामध्ये क्रीडा संकुल उभारण्यासाठी जलसंपदा विभागाची जमीन हस्तांतरीत करण्याबाबत

**(११) ६८२४८ (२३-०८-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यामध्ये क्रीडा संकुल उभारण्यासाठी शासकीय व खाजगी जमीन उपलब्ध होत नसल्याने क्रीडा संकुल उभारणीचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील क्रीडा संकुलासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या मालकीची सर्व न.१६४ मधील महाराष्ट्र शासन जलसिंचन वसाहत कार्यालय या नावानं संपादित असलेली विनावापर पडून असलेली सदरील २ हेक्टर जमीन क्रीडा विभागास हस्तांतरित करण्याबाबत व त्याठिकाणी तातडीने क्रीडा संकुल उभारण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री व मा.पालकमंत्री, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२८-०२-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) तालुका क्रीडा संकुल, औसा च्या उभारणीकरिता कतपूर रोडवरील जलसंपदा विभागाची वसाहत गट क्र. १६४

मधील खाते क्र. ११४८४६ मधील ०२.०५ हे. आर. शासकीय जमीन विनामुल्य उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दि. ११.१२.२०२३ रोजी पाठविण्यात आलेला आहे. जलसंपदा विभागाकडून औसा तालुका क्रीडा संकुलासाठी जागा प्राप्त होताच संकुल उभारणीची पुढील कार्यवाही करण्यात येईल

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पूणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या पुनर्बांधणीसाठी भौतिक सुविधा निर्माण करण्यसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१२) ६८७३३ (२८-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पूणे) तालुक्यात ८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३७ उपकेंद्र कार्यरत असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्र रावणगांव, बोरीपार्धी, खानोटा, गिरीम, सोनवडी येथील इमारतीच्या पुनर्बांधणीस १५ व्या वित्त आयोगातुन निधी मिळण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक आरोग्य केंद्र व उपकेंद्राना संरक्षण भिंत, कमर्चारी निवासस्थाने तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने याबाबतची मागणी देखील तालुका आरोग्य अधिकारी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांना मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात लोकप्रतिनिधीनी कळविलेली कामे जिल्हा नियोजन समितीने उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या मर्यादेत दौंड तालुक्यातील १३ कामांस मान्यता दिलेली असून उर्वरित कामे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रस्तावित केलेली आहेत.

(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात दौंड तालुक्यातील १३ कामासाठी एकूण रू.१९९.८९ लक्ष एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ, नांदेड, लातूर, धाराशिव व बारामती या पाच विमानतळांच्या प्रलंबित कामांबाबत**

**(१३) ६९१२८ (३१-०८-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ, नांदेड, लातूर, धाराशिव व बारामती या पाच विमानतळांच्या आधुनिकीकरण, विस्तारीकरण तसेच देखभाल दुरुस्तीचे रिलायन्स उद्योग समुहाकडून करण्यात येणारे काम गत १४ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कंपनीने या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे या विमानतळांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झालेली असून या ठिकाणी हवाई वाहतूक करणे धोक्याचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नमूद विमानतळांच्या आधुनिकीकरण व विस्तारीकरणाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

संबंधित अनुक्रमे मे.लातूर एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि., मे.धाराशिव एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि., मे.नांदेड एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि. या कंपनीने क्रमशः लातूर, धाराशिव व नांदेड येथील विमानतळाच्या आधुनिकीकरण, विस्तारीकरण तसेच देखभाल दुरुस्तीचे काम न केल्यामुळे विमानतळांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे असे महासंचालक, नागरी विमान वाहतूक भारत सरकार यांनी प्रधान सचिव नागरी विमान वाहतूक महाराष्ट्र शासन यांना ई-मेल दिनांक ०८/१०/२०१८ द्वारे कळवले आहे.

नांदेड एअरपोर्ट मार्च,२०२१ पर्यंत कार्यान्वित होते, परंतु भारतीय हवाई अड्डा प्राधिकरणाने CNS-ATM सर्विसेसचे देयक अदा न केल्यामुळे नांदेड एअरपोर्ट कार्यान्वित नाही.

(३) विमानतळांकरीता पायाभूत सुविधांसाठी केलेला एकूण खर्च व सदर विकासकांकडून विविध सेवाशुल्कापोटी मऔवि महामंडळास देय असलेली एकूण रक्कम रूपये २०४.९९ कोटी मधून महामंडळास मे.रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स लि., यांच्या कडून प्राप्त झालेला महसूल रूपये ६३.०० कोटी वजा करता शिल्लक रक्कम रूपये १४१.९९ कोटी मऔवि महामंडळास अदा करण्याच्या अटीसापेक्ष मे.महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (MADC) यांना जसे आहे तसे या तत्वावर(As is where is basis) व्यवस्थापन, परिचालन व देखभाल व दुरूस्ती करीता हस्तांतरित करण्याकरीता प्रधान सचिव (उद्योग) तसेच अतिरिक्त मुख्य सचिव आणि उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मे.महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (MADC) यांच्याकडे MIDC चे अभिप्राय दि.०२ जून, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मे.महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (MADC) यांनी त्यांचे पत्र क्र.५२८, दि.१९/०७/२०२३ अन्वये सदरील विमानतळे हस्तांतरणासंदर्भात महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यांना याबाबतची प्रक्रीया जाणून घेण्याकरीता प्राधिकृत करण्याबद्दल कळविले आहे. तद्नंतर मऔवि महामंडळाने M/s. Reliance Airport Developers Ltd., यांना हस्तांतरीत केलेली नांदेड, लातूर, यवतमाळ, बारामती व उस्मानाबाद ही पाचही विमानतळे त्यांच्या सोबत केलेल्या करारनाम्याच्या अटी व शर्तीच्या उल्लंघनाबाबत दिनांक २८/०८/२०२३ रोजीच्या पत्रानुसार त्यांच्याकडून अभिप्राय मागिवले असून, पुढील १२० दिवसांत याबाबत सुधारात्मक उपाय (Corrective Measures) घेतले नाही तर त्यांना हस्तांतरीत करण्यात आलेली पाचही विमानतळे काढून घेण्याची प्रक्रीया मऔवि महामंडळामार्फत सुरू करण्यात येईल असे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात चंद्रपूर जिल्ह्यासह शहरातही कुस्ती खेळणाऱ्यांस सरावासाठी हक्काची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ७०५८० (२५-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यासह शहरातही कुस्ती खेळणाऱ्यांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे २५ जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपुरात मल्ल घडावेत म्हणून प्रशिक्षक धर्मशील काटकर हे ज्युबिली हायस्कूलच्या मैदानावर कुस्तीचे नि:शुल्क धडे देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कुस्तीगारांच्या सरावासाठी हक्काची जागाच नसल्याने त्यांच्यामध्ये खंत निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्तीला प्राधान्य देऊन मान्यता मिळण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२८-०२-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) चंद्रपूर जिल्हयात मुल, वरोरा व बल्लारपूर या तालुका क्रीडा संकुलांमध्ये कुस्ती खेळाचे रीतसर प्रशिक्षण सुरु आहे. एकविध कुस्ती खेळ संघटनेच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यातील कुस्ती खेळाचा प्रचार प्रसार करण्याचा अनुषंगाने जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत येणाऱ्या ज्युबिली हायस्कूल चंद्रपूर येथे सुरु असलेल्या प्रशिक्षण करिता व खेळाडूंना सरावाकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर मार्फत कुस्ती या खेळाची मॅट उपलब्ध करण्यात आली असून कुस्ती या खेळाचे दैनंदिन प्रशिक्षण सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पदवीधर अंशकालीन उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत**

**(१५) ७०६४८ (२५-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाकडून पदवीधर अंशकालीन उमेदवारांकडून शासकीय कार्यालयामध्ये मानधन तत्वावर शासकीय कामे करुन घेण्यात आली होती व त्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी धोरण ठरविले होते, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर पदवीधर अंशकालीन उमेदवारांना आतापर्यंत शासनाकडून महाराष्ट्रात किती उमेदवारांना शासन सेवेत सामावुन घेतले व प्रतिक्षा यादीत किती शिल्लक उमेदवार आहेत,
(३) असल्यास, शासनाचे वेगवेगळया खात्यामध्ये प्रचंड प्रमाणात पदे रिक्त असुन सुध्दा प्रतिक्षा यादीत शिल्लक असलेल्या पदवीधर अंशकालीन उमेदवारांना आता पर्यंत सामावून न घेतल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रतिक्षा यादीत शिल्लक पदवीधर अंशकालीन उमेदवारांना शासन सेवेत कसे व किती कालावधीत सामावून घेणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२७-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सरळसेवा भरतीमध्ये पदवीधर अंशकालीन उमेदवारांना १०% आरक्षण विहित करण्यात आले आहे.
(२) कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार २१,८२५ नोंदणीकृत पदवीधर अंशकालीन उमेदवारांपैकी १,८५५ उमेदवार नियमित नोकरी प्राप्त झाली असून ५७५ उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नोकरी प्राप्त झाली आहे.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०३.१०.२०१६ च्या शासन निर्णयानुसार शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सरळसेवा भरतीमध्ये पदवीधर अंशकालीन उमेदवारांना १०% आरक्षण विहित करण्यात आले. त्यानुसार संबंधित विभागामार्फत स्पर्धा परीक्षा घेऊन पदभरती करताना उपलब्ध असलेल्या एकूण पदांपैकी १०% उमेदवार अंशकालीन उमेदवारांमधून भरले जातात.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०२.०१.२०१९ च्या शासन निर्णयानुसार सरळसेवा भरतीसाठी अंशकालीन उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ४६ वरून वाढवून ५५ वर्षे इतकी करण्यात आली.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या दि. १६.०८.२०१८ च्या शासन निर्णयानुसार विविध विभागांमध्ये कंत्राटी तत्वावर पदभरती करण्यासाठी एकूण १८,६४४ नोंदणीकृत उमेदवारांची यादी www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर अद्ययावत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पालवण (ता.बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत ई-निविदेत व कार्यारंभ आदेशामध्ये अनियमितता होत असल्याबाबत**

**(१६) ७१५६८ (११-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पालवण (ता.बीड) येथील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना होणेसाठी सुचना क्र.ज.जि.मी./०२/२०२२-२३ नुसार दि.१४.०३.२०२२ ते २१.०३.२०२२ पर्यंत ई-निविदा ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. बीड या कार्यालयामार्फत प्रसिद्ध झालेली होती. त्यानुसार सदर कामाची प्रशासकीय किंमत १,८७,४२५७ असून निविदेमध्ये एकूण पाच कंत्राटदाराने प्रत्यक्ष सहभाग नोंदविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निविदा होत असतांना अटी व शर्थीनुसार कंत्राटदारांना टेंडर आयडी असणे महत्त्वाचे होते, परंतु पाच पैकी दोन कंत्राटदारांना आयडी नसल्यामुळे त्यावेळी टेंडर आयडी नसलेल्या कंत्राटदार मे.समीर कन्स्ट्रक्शन, जालना व मे.सुजाता कन्स्ट्रक्शन, उस्मानाबाद यांना त्यावेळी अपात्र करण्यात आलेले होते. तसेच काही तांत्रिक अडचणीमुळे काही व्यक्तीं मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या सुचनेनुसार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांनी क्र.२ दि.१४.०३.२०२२ ची निविदा रद्दबादल ठरवत ई-निविदा सूचना क्र.ज.जि.मि./०९/२०२२-२३ दि.१५.११.२०२२ नुसार सदर गावाची ई-निविदा पुन:श्च प्रसिद्ध केलेली असून त्यामध्ये एकूण सात कंत्राटदाराने प्रत्यक्ष निविदेमध्ये सहभाग नोंदवलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयामध्ये दोन्ही प्रसिद्ध झालेल्या निविदेबाबत प्रकरण दाखल झाल्याने काही काळ याविषयी मा.उच्च न्यायालयात प्रकरण चालविण्यात आले त्यानुसार दि.०४.०७.२०२३ रोजी मा.उच्च न्यायालयाचे विधीज्ञ श्री.सुर्यवंशी यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याचिका क्र.६४११/२०२२ मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२७.०६२०२३ रोजी आदेश पारीत करून आदेशीत केलेले आहे की, प्रथम निविदा दि. १४.०३.२०२२ नुसार ग्राह्य धरून पुढील ६० दिवसात सदरील निविदा धारकांना कार्यारंभ आदेश देणेबाबत सुचित केलेले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक १४.०३.२०२२ च्या निविदेमध्ये दोन कंत्राटदाराकडे जि.प.बीडच्या नियम व अटीनुसार ऑनलाईन टेंडर आयडी अपलोड केलेली नसतांना देखील त्यांच्याकडून ऑफलाईन पद्धतीने टेंडर आयडी प्रदिर्घ कालावधीनंतर घेण्यात आलेले असून सन २०२१-२२ चे आयटी रिटर्न देणे बंधनकारक असतांना ई-निविदा देत असतांना त्यांनी २०२०-२१ चे आयटी रिटर्न अपलोड केलेले आहेत. त्याउलट उर्वरित तीन निविदा धारकांनी सर्व कागदपत्रे ई-निविदेच्या नियमानुसार दाखल केलेले असतांना सुद्धा तसेच आरोही सोल्युशन यांनी दि. १९.०४.२०२२ ला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांच्या दालनातील बैठकीनुसार जीएसटी व पॅनकार्ड नियमोचीतरित्या विभागाकडे देण्यात आलेले होते. तथापि, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी सदरील मुद्याचे अवलोकन न करता अनियमितता करत प्रत्यक्ष दोन कंत्राटदारांकडे टेंडर आयडी नसतांना व तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र दि.२२.०८.२०२२ नुसार विवरण पत्र अ यामध्ये क्र.२४ मध्ये मे.समीर कन्स्ट्रक्शन जालना यांना वर्कडन व इतर त्रुटीच्या बाबतीत कळवले असून सुद्धा त्यांना होत असलेल्या निविदेमध्ये व सदरील गावात, मतदार संघातील व जिल्ह्यातील इतर गावात देखील अनियमिततेला ग्राह्य धरून पात्र करण्यासंदर्भात ग्रामीण पाणी पुरवठा विभाग पुढाकार घेत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या होत असलेल्या अनियमिततेबाबत ग्रामपंचायत मौजे पालवण (ता.जि.बीड) व उपरोक्त तीनही कंत्राटदाराने रितसर नियमानुसार कार्यालयाकडे व सन्माननीय सदस्यांकडे तक्रार दाखल केलेली असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवलोकन करत मौजे पालवण येथील जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा कामाच्याबाबतीत सर्व संचिकेची त्रयस्त समितीमार्फत किंवा विभागामार्फत तपासणी करण्याची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदरील नळ पाणी पुरवठा योजनेच्या ई-निविदा प्रसिध्दीमध्ये नमूद अटी व शर्तीमध्ये टेंडर आयडी मुळे उक्त दोन्ही कंत्राटदारास अपात्र केले नव्हते. सदरील ई निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने काही व्यक्तींनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे दाद मागितली होती.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.

समिर कन्स्ट्रक्शन, जालना व सुजाता कन्स्ट्रक्शन, उस्मानाबाद यांनी दिलेल्या अनुभव प्रमाणपत्रात कामाचा टेंडर आयडी नमूद नसलेबाबतची किरकोळ स्वरुपाची त्रुटी शासन निर्णय दिनांक २६.०९.२०१८ मधील तरतुदी प्रमाणे पुर्तता करुन घेण्यात आली आहे.
(६) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांची याचिका क्रमांक ७०२३/२०२३ मध्ये दिनांक २७.०६.२०२३ रोजीच्या आदेशात ई-निविदा क्रमांक २ मधील L-१ धारकास कार्यारंभ आदेश ६० दिवसात द्यावेत असे निर्देश प्राप्त झालेले होते. त्यानुसार कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याकरीता संचिका प्रस्तावित केली असता दरम्यानच्या काळात मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे याचिका क्र. ११४८८/२०२३ नुसार दाद मागितली आहे. तथापि, सदरील योजना वेळेत पूर्ण होण्यासाठी याचिका क्रमांक ११४८८/२०२३ मधील येणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहून दिनांक ३१.१०.२०२३ कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहे.
(७) विलंब झालेला नाही.

---

## राज्यात बालमृत्यू व कुपोषण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१७) ७१६९३ (१२-०३-२०२४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ६ महिन्यात एकूण ६, ६४६ मुलांचा कुपोषणाने मृत्यू झाला असून ६९०५९ बालके कुपोषित असून केवळ तीव्र कुपोषणाच्या श्रेणीत नसल्यामुळे उपचारांपासून वंचित असल्याची बाब सार्वजनिक आरोग्य विभागातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील प्राथमिक केंद्रात येणाऱ्या गर्भवती महिलांमध्ये किशोरवयीन गर्भवतींचे प्रमाण वाढत असून जिल्हयात मागील तीन वर्षात १९ बालविवाह रोखण्यात यश आले असतानाच याच कालावधीत १४ ते १७ वयोगटातील तब्बल २३१ हून अधिक किशोरवयींन मातांची नोंद झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मेळघाटामध्ये विविध योजना आणि त्यावर होणारा करोडोंचा खर्च करुनही माहे एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांत ४१ बालमृत्यू, १६ अर्भक मृत्यू आणि ३ मातामृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, नागपूरात सन २०१९-२० मध्ये १०३६, सन २०२०-२१ मध्ये ९८०, सन २०२१-२२ मध्ये ९६२ आणि सन २०२३ -२४ मध्ये ९९३ अशी शून्य ते एक वर्षांच्या आतील अर्भकांच्या मृत्यूची नोंद झाली असल्याची माहिती दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अल्पवयात लादलेल्या मातृत्वामुळे बालमृत्यू आणि कुपोषणाचे प्रमाणही वाढत असून राज्यातील बालमृत्यू रोखण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, जननी सुरक्षा अभियान कार्यान्वित असतानाही अपेक्षित यश मिळत नसल्याचे अधोरेखित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, बालमृत्यू व कुपोषण रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

ठाणे जिल्हायात ग्रामीण कार्यक्षेत्रात १४ ते १७ वयोगटातील २४७ किशोरवयीन मातांची नोंद झाली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयात सन २०१९-२० - १०३६, सन २०२१-२१- ९८०, सन २०२१-२२-९६२, हे खरे आहे. मात्र सन २०२२-२३ मध्ये ९९३ मृत्यूंची नोंद झालेली आहे. सन २०२३-२४ मध्ये माहे ऑक्टोंबर पर्यंत ३१२ अर्भक मृत्यू झाले आहेत.

(५) हे खरे नाही.

राज्याने शाश्वत विकासाचे ध्येय (SDG) २०३० नूसार बालमृत्यू (दर हजारी जन्मामागे २५) व मातामृत्यू (प्रति लक्ष जन्मामागे ७०) कमी करण्याचे लक्ष्य विहित कालावधीपूर्वी साध्य केलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या SRS २०२० च्या अहवालानूसार अर्भक मृत्यू दर १६ असून मोठया राज्यामध्ये देशात तिसरा क्रमांक आहे. तसेच SRS बुलेटीन २०१८-२० नुसार मातामृत्यू दर ३३ असनू देशात मोठयरा राज्यात दुसरा क्रमांक आहे. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्याने महाराष्ट्र राज्यात बालमृत्यू आणि मातामृत्यू दरात सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे.

(६) बालमृत्यू व कुपोषण रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविल्या जातात.

१. आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU) कार्यरत आहेत.

२. नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (NBSU)/नवजात शिशु कोपरा (NBCC) येथे नवजात बालकांना सेवा दिल्या जातात.

३. बाल उपचार केंद्र (CTC) आणि पोषण पुर्नवसन केंद्र (NRC)-या मध्ये आजारी तीव्र कुपोषित बालकांवर उपचार करण्यात येतात.

४. जंतनाशक व जीवनसत्व “अ” मोहिम यामध्ये दर ६ महिन्यांनी सर्व बालकांना जंतनाशकाची गोळी व अ जीवनसत्वाचा डोस देण्यात येतो.

५. घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC)- या मध्ये आशाद्वारे सर्व नवजात शिशुंना ६ गृहभेटी देण्यात येतात.

६. घरच्या घरी बाळाची काळजी (HBYC)- यामध्ये ३ ते १५ माहिने वयोगटातील बालकांना आशाद्वारे ५ गृहभेटी देण्यात येतात.

७. जोखीमग्रस्त कार्यक्षेत्रातील आशांमार्फत अतिसार, न्युमोनिया व सेप्सीस या आजारांचे व्यवस्थापन करण्यात येते.

८. Mother Absolute Affection (MAA)- स्तनपान व शिशु याबद्दल मातांना समुपदेशन येते.

९. नियमित लसीकरण- त्या अंतर्गत सर्व बालकांना लसीकरण करण्यात येते.

१०. अतिसार नियंत्रण पंधरावडा- या अंतर्गत आशाद्वारे गृहभेटी दरम्यान अतिसार नियंत्रण बद्दल पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येते.

११. ॲनिमिया मुक्त भारत- या अंतर्गत आएएफएच्या सिरप/गोळीचे वाटप करण्यात येते.

१२. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम- या अंतर्गत बालकांमधील आजार, व्यंग, जीवनसत्वाची कमतरता यांचे निदान करून उपचार करण्यात येतात.

---

**राज्यातील आशा सेविका व गटप्रवर्तक यांच्या प्रलंबित मागण्याची पूर्तता करणेबाबत**

**(१८) ७१७०५ (१२-०३-२०२४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल शेळके (मावळ), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ७० हजार आशा स्वयंसेविका व ४ हजार गटप्रवर्तक कार्यरत असून त्यांना दरवर्षी दिवाळीपूर्वी एका महिन्याचे मानधन इतका बोनस देण्यात यावा, मानधनात वाढ करावी, किमान वेतन लागू करावे, शासकीय कर्मचारी दर्जा देणे, वेतनवाढ मंजूर करणे, प्रसुती रजा व वैद्यकीय रजा देणे, मोबाईलमध्ये रिजार्च भत्ता किमान ३०० रुपये देणे, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेला किमान ५०० रुपये देण्यात यावे. त्याशिवाय वैयक्तिक मोबाईलमध्ये आधारकार्ड काढणे व लसीकरणाच्या लाभार्थ्यांची नोंद करणे आदिची सक्ती न करणे यासह अन्य विविध मागण्या अद्यापही प्रलंबित असल्याने त्यांनी मुंबईतील आझाद मैदान येथे दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आशा सेविका व गटप्रवर्तक यांच्या विविध मागण्यांसाठी यापुर्वीही आंदोलने करुन देखील त्यांच्या मागण्या अद्यापही प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, आशा सेविका व गटप्रवर्तक हे प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आंदोलन करीत असल्याने त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनीधींनी निवेदनाद्वारे शासनाकडे करीत असल्याचे ही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आशा सेविका व गटप्रर्वतक यांच्या प्रलंबित मागण्याची पूर्तता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कारण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे आहे.
(४) "आशा स्वयंसेविका" योजनेची अमंलबजावणी केंद्रशासनस्तरावरील मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात येते.

आशा स्वयंसेविका कामावर आधारित मोबदला व गटप्रवर्तक हे क्षेत्रीय भेटीवर कामावर आधारित मोबदला या तत्वावर नियुक्त करण्यात येतात. त्यामुळे आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना बोनस, किमान वेतन, शासकीय कर्मचारी दर्जा देणे, वेतनवाढ मंजूर करणे इ. बाबी लागु होत नाहीत. आशांना राज्य शासन निधीमधुन मासिक रू. ३५००/- व गटप्रवर्तक यांना मासिक रु.४७००/- मोबदला अदा करण्यात येत होता. दि.१ एप्रिल २०२३ पासुन सदर निधीमध्ये मासिक रू.१५००/- मानधन वाढ लागु करण्यात आली. आशांना राज्य शासन निधीमधुन मासिक रु.५०००/- व गटप्रवर्तक यांना मासिक रु.६२००/- मोबदला अदा करण्यात येत आहे.

तथापि, आशा स्वंयसेविका यांना राज्य शासनाच्या निधीतून अदा करण्यात येणाऱ्या दरमहा रुपये ५०००/- या मानधनामध्ये आणखी दरमहा रुपये ५०००/- इतकी वाढ करण्यास व गटप्रवर्तकांच्या मानधनामध्ये रु.१०००/-इतकी वाढ करण्यास दि.१३.०३.२०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला असून त्याप्रमाणे उपरोक्त प्रस्तावित केलेली वाढ नोव्हेंबर, २०२३ या महिन्यापासून देय होणाऱ्या मानधनात अदा करण्याबाबतचे निर्देश देण्यात येतील.
प्रसुती रजा व वैद्यकीय रजा लागु करणेबाबत धोरण निश्चित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना मोबाईल भत्ता वाढवुन मिळणेबाबत व कामावर आधारित मोबदल्याचे वाढवुन दर मिळणेबाबत केंद्रशासनस्तरावर कळविण्यात आले आहे. केंद्रशासनच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आशांच्या माध्यमातुन ऑनलाईन कामे करण्यात येत आहेत. त्यासाठी त्यांना कामावर आधिरित मोबदला अदा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वैद्यकीय सेवा बळकट करण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(१९) ७१७०६ (११-०३-२०२४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), ॲड.अशोक पवार (शिरुर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय तसेच ग्रामीण रुग्णालयात अपुऱ्या मनुष्यबळामुळे तसेच औषधांच्या अपुरा पुरवठा यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर पदांपैकी १८ टक्के पदे अद्यापही रिक्त असून जिल्हा परिषदेतील कर्मचारी वगळता उपलब्ध असलेल्या वर्गनिहाय कर्मचाऱ्यांची ६८ हजार १७ मंजूर पदांपैकी केवळ ४८ हजार ९१५ पदे भरलेली असून उर्वरीत ११ हजार १०२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, वैद्यकीय अधिकाऱ्यांची १०,९२५ मंजूर पदांपैकी ८,८६९ पदे भरली असून १९ टक्के पदे रिक्त असून संचालक आरोग्यसेवा विभागातील २ संचालक, ४ अतिरिक्त संचालक, ५ सहसंचालक, २३ उपसंचालक जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील १२१, जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील ३३८, तज्ञ डॉक्टरांची ४७९, "अ" श्रेणीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ९८३ व "ब" श्रेणतील २३८ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रुरल हेल्थ स्टॅटिस्टिक्स च्या सन २०२१-२२ च्या अहवालानुसार आरोग्य विभागात रिक्त पदे असून अनेक आरोग्य उपकेंद्रात कर्मचारी वर्गाला पुरेशा मुलभूत सोयी-सुविधाही मिळत नाहीत व राज्यातील आदिवासी लोकसंख्येला एकूण ३१६७ उपकेंद्राची आवश्यकता असताना प्रत्यक्षात केवळ २०७६ केंद्रच अस्तित्वात आहेत तरीही शासनाकडून मोफत आरोग्यसेवेच्या योजनेची घोषणा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, रिक्त पदामुळे मर्जीतील एका – एका अधिकाऱ्याकडे दोन – तीन अधिभार देण्यात आले असून कितेकदा ज्येष्ठ वैदकीय अधिकाऱ्यांना डावलून मर्जीतील कनिष्ठ वैदकीय अधिकाऱ्यांना पदश्रेणी अवनत करून उच्च पदावर तात्पुरत्या पदोन्नती दिल्याअसल्याने आरोग्य विभागात गैर कारभार सुरु असल्याचे अनेक वेळा निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाने "क" आणि "ड" श्रेणीतील रिक्त जागांसाठी १२ हजार पदे भरण्याचा निर्णय दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला असून सदर जागा राज्य लोकसेवा आयोग, राज्य निवड मंडळ आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्यामार्फत भरण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, राज्यात वैद्यकीय सेवा बळकट करण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत राज्यात आदिवासी भागासह एकूण १०७४८ उपकेंद्रे कार्यान्वित असून त्यामध्ये कार्यरत कर्मचारी वर्गाला मुलभूत सोयी-सुविधा उपलब्धतेनुसार पुरेशा प्रमाणात पुरविल्या जातात.
(५) हे खरे नाही.
(६) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने गट "क" व "ड" श्रेणीतील सरळसेवेने एकूण १०९४९ पदे भरण्यासाठी दि.२८.०८.२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदे भरण्यासाठी टीसीएस/ आयओएन या कंपनीची निवड करण्यात आली होती.
(७) या विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

## पनवेल-उरण (जि.रायगड) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या (MJP) जलवाहिन्या अनेक ठिकाणी फुटून दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत

**(२०) ७१७२३ (२९-०२-२०२४). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा

खुलासा करतील काय :-
(१) पनवेल-उरण (जि.रायगड) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या (MJP) अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटून दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यात पाणी टंचाईचा तीव्र प्रश्न भेडसावत असताना संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तातडीने जलवाहिन्या दुरूस्तीचे काम होत नसल्याने दररोज लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार नादुरुस्त जलवाहिन्या दुरुस्त करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-१ देखभाल दुरुस्ती अंतर्गत नवीन पनवेल, कळंबोली, करंजाडे या सिडको वसाहत, पनवेल महानगरपालिका व पनवेल तालुक्यातील मार्गस्थ १८ गावे तसेच उरण तालुक्यातील जे.एन.पी.टी. पोर्ट यांना ठोक स्वरुपात पाणी पुरवठा केला जातो. सदर योजना ३८ वर्षे जुनी असल्यामुळे कालबाहय झाली असून, खारट हवामानामुळे जास्त प्रमाणात जलवाहीन्या गंजल्याने जीर्ण होऊन वारंवार फुटुन गळत्या होत आहेत. सदर गळत्या नियमित शटडाऊन घेऊन दुरुस्त करण्यात येत आहेत.
(३) जलवाहिन्या नादुरुस्तीनंतर तातडीने शटडाऊन घेऊन दुरुस्तीचे काम पूर्ण करुन नियोजित वेळेत संबंधित ग्राहकांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. या योजनेतुन पनवेल तालुक्यातील फक्त १८ गावांना पाणी पुरवठा करण्यात येत असून, सदर ठिकाणी पाण्याची टंचाई नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील बाल संगोपन योजनेअंतर्गत प्रलंबित प्रस्तावाबाबत

**(२१) ७१७३३ (२१-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना संसर्गामुळे एक किंवा दोनही पालकांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या अठरा वर्षांखालील बालकांना शासनाकडून शिक्षणासाठी अडीच हजार रुपयांचे अनुदान बाल संगोपन योजनेअंतर्गत दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यात बालसंगोपन योजनेअंतर्गत ५ ते ७ हजार प्रस्ताव मंजुरीविना असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील बाल संगोपन योजनेअंतर्गत प्रलंबित प्रस्तावांना आतापर्यंत मान्यता देण्यात आलेली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या दि.३०.५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने बालकाची कौटुंबिक, शारीरीक, मानसिक व शैक्षणिक प्रगती अहवाल प्राप्त करुन घेतल्यानंतर बाल कल्याण समितीकडून बालकांची शिफारशी देण्यात येतात. अहमदनगर जिल्ह्यातील प्रस्तावांची संख्या, अपुरे मनुष्यबळ योजना लागू करण्याचे निकष यांमुळे ९१२२ प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली आहे.
(४) अहमदनगर जिल्ह्यातील ९१२२ बाल संगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना बाल कल्याण समितीकडून शिफारस प्राप्त झालेली असून जिल्हा कार्यालयाने मान्यता दिली आहे. तसेच नव्याने दाखल झालेल्या ३४६७ प्रस्तावांपैकी २४७४

प्रस्तावांची छाननी प्रक्रीया पूर्ण झाली असून सदर प्रस्तावांची मान्यता अंतिम टप्प्यामध्ये आहे. यापैकी उर्वरित ९९३ प्रस्तावांची छाननी प्रक्रीया सुरु असून छाननीनंतर सदर प्रस्तावांना मान्यता देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(२२) ७१९२४ (२५-०२-२०२४). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने आडाळी येथे साडेसातशे एकर जमीन खरेदी केली व औद्योगिक क्षेत्र जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी १० वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही सुविधा उपलब्ध नसून औद्योगिक क्षेत्र अधिकारी यांना कागदोपत्री उद्योग येण्यासाठी ऑनलाईन भूखंड खुले केले हे कागदोपत्री दिसते, मात्र प्रत्यक्षात उद्योजकांची दिशाभूल केली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी रस्त्यांचे काम अपूर्ण असून कुठेही भूखंड सपाटीकरण नाही, त्यामुळे या ठिकाणी उद्योग उभे कसे करावेत असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त औद्योगिक क्षेत्राचा विकास होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) आडाळी ओद्योगिक क्षेत्रात खडीमातीचे रस्ते बांधणे, प्राथमिक डांबरीकरण करणे, पाणी पुरवठा वितरण वाहिन्या जोडणी करणे, रस्त्यांवर स्ट्रीट लाईट उभारणे इत्यादी कामांचा समोवश असून, सदर पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण करण्यात आली असून, दुसऱ्या टप्प्यातील कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) नव्याने विकसित झालेल्या आडाळी ओद्योगिक क्षेत्राकरीता आवश्यक पायाभूत सुविधा पुरविणेबाबतची कामे मऔवि महामंडळाने हाती घेतली आहेत. ज्यामध्ये आडाळी औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्याची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

तसेच आडाळी औद्योगिक क्षेत्रामधील भुखंडाच्या वाटपाची प्रक्रिया सुरु असून, एकूण १४ भुखंडाचे वाटप मऔवि महामंडळामार्फत करण्यात आले असून, १९० भुखंडांकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत व त्यामधील ४३ भुखंडकरीता प्रादेशिक अधिकारी, रत्नागिरी यांचेकडे अर्ज प्राप्त झालेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणामध्ये म्हाडस धरणाचे पाणी कालव्याव्दारे सोडण्याबाबत

**(२३) ७२१०४ (२५-०२-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणामध्ये म्हाडस धरणाचे पाणी कालव्याव्दारे सोडण्याचा प्रस्ताव एमआयडीसीच्या

विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी विचाराधीन असलेल्या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त परिसरातील पाण्याची समस्या सोडविण्याबाबत आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) म्हाडस (मुरबाडी) धरण ते बारवी धरण कालवा करण्यासाठी सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे. तद्नंतर प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सदरचे काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय अधिकाऱ्यांच्या ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड या देशाच्या अभ्यास दौऱ्याबाबत

**(२४) ७२४३२ (०६-०३-२०२४). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आशियाई बँकेच्या अर्थसहाय्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्यात येत असून सदर बँक आणि नेमण्यात आलेली तांत्रिक सल्लागार कंपनी सट्रा सर्व्हिसेस अँड सोल्युशन प्रा.लिमिटेड यांच्या खर्चातून राज्यातील १९ अधिकारी दिनांक १३ ते २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड या देशांच्या अभ्यास दौऱ्यावर गेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभ्यास दौऱ्याचा कोणताही खर्च ग्रामविकास विभागाकडून केला जाणार नसल्याचे दिनांक ११ ऑगस्ट,२०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यास दौऱ्यात, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यपध्दतीचा परिचय कामातील वैविध्यपूर्ण कौशल्याचा विकास व कर्मचाऱ्यांची क्षमतावाढ या उद्देशाने आयोजित करुन अभ्यास दौरा पूर्ण झाल्यानंतर त्याचा विस्तृत अहवाल शासनास (ग्रामविकास विभाग व सामान्य प्रशासन विभाग) सादर करावा असेही सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अभ्यास दौऱ्याचा अहवाल संबंधितांनी (ग्रामविकास व सामान्य प्रशासन विभाग) शासनास सादर केला आहे काय, असल्यास केव्हा, तसेच त्यामधील सर्वसाधारण मुद्दे काय आहेत,
(५) तसेच मुंबईतील रस्त्यावरील उघडे नाले व त्यामुळे होणारे अपघात याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष याबाबत मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगर प्रदेशाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मा.आयुक्तांबाबत नोंदविलेले निरीक्षण लक्षात घेता, सदरचा अभ्यास दौरा सफल ठरला आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१), (२), व (३) हे खरे आहे.
(४) सदर दौऱ्यात ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड येथील रस्ते व सुरक्षाबाबत अवलंबिण्यात येत असलेल्या Best Practices बाबतची माहीती तसेच रस्ते बांधकामात गुणवत्तेची दक्षता याबाबींसंदर्भात अभ्यास होणे आवश्यक होता त्यानुसार सदरहू अभ्यास दौ-याच्या अहवाल विभागाने दि.०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागास सादर केला आहे.तसेच सदरहू अहवालाच्या अनुषंगाने दि.२९.०१.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये रस्ते बांधकामास सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(५) सदरहू प्रशिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था कर्मचाऱ्यांची क्षमता वाढविणे आणि महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अधिकाऱ्यांना आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यपद्धतींचा परिचय

व्हावा, ज्यायोगे संस्थेअंतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांना त्यांच्या कामामध्ये वैविध्यपूर्ण कौशल्ये विकसित होतील, अशा व्यापक दृष्टीकोनातून आंतराष्ट्रीय प्रशिक्षण व अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.
(६) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावांची वीज देयके माफ करुन पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२५) ७२९१६ (०६-०३-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील तीन गावांचा पाणीपुरवठा विद्युत देयके न भरल्याने खंडित करण्यात आल्याने पाणीटंचाई निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील नागरिकांना ऐन पावसाळयात पाण्यासाठी भटकंती करावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त गावांची वीज देयके माफ करुन तेथे सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१४-०६-२०२४) :** (१) माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये सावली तालुक्यातील सोनापुर (४ गावे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, व्याहाड खुर्द (३ गावे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आणि साखरी (४ गावे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या निधी अभावी विद्युत देयके वेळेवर न भरल्याने वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. त्यामुळे योजना १८ ते २० दिवसांच्या कालावधीसाठी बंद ठेवण्यात आली होती, हे खरे आहे.
(२) व (३) सदर कालावधीत गावातील नागरीकांना उपलब्ध असलेल्या इतर स्त्रोताद्वारे (सार्वजनिक हातपंप, विहिरी इ.) पाणी उपलब्ध होते. सावली तालुक्यातील तीनही प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची वीज देयके (रु.६,३७,९७०/-) जिल्हा परिषदेच्या उपलब्ध जिल्हा निधीतून भरणा करण्यात आलेली असून, सद्यस्थितीत योजनेतील पाणी पुरवठा सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगांव (जि.बुलढाणा) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीच्या नवीन कार्यशाळा व प्रशासकीय बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत

**(२६) ७३२१० (२८-०२-२०२४). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था ही जिल्हयातील सर्वात मोठी प्रशिक्षण संस्था असून या संस्थेच्या इमारतीस ५० वर्ष झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेची प्रशासकीय इमारत व कार्यशाळा क्र.०१ व ०२ या शिकस्त झाल्या असून या ठिकाणी विद्यार्थी नेहमी येत असल्याने शिकस्त इमारतीमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने येथे नवीन इमारत बांधकामाची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रशिक्षण संस्थेच्या नवीन कार्यशाळा व प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर

प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१५-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव या संस्थेचे प्रशासकिय इमारत, कार्यशाळा क्र.०१, कार्यशाळा क्र.०२ या इमारतीचे एकूण रु.४००७.९६ लक्ष रकमेचे ३ ढोबळ अंदाजपत्रकासह संचालनालयाने प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तथापि, सदर बांधकामाच्या अनुषंगाने DPR तयार करण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरु आहे. सदर DPR ला वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) लागू नाही.
(५) लागू नाही.

---

## जत (जि.सांगली) तालुक्यातील गावांचा समावेश जलजीवन योजनेत करण्याबाबत

**(२७) ७३३६५ (०१-०३-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुका येथे पाणी पुरवठयासाठी शासनाने शहराचा अमृत-२.० योजनेत समावेश करावा, विस्तारीत योजनेची संपूर्ण निविदा राबविण्यात यावी, उमदीसह २९ गावांची प्रादेशिक योजना रद्द करुन सर्व गावांसाठी स्वतंत्र योजना करावी अशी मागणी जत तालुक्याच्या शिष्टमंडळाने संबंधित मंत्री महोदयांना निवेदनाद्वारे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जत तालुक्याच्या शिष्टमंडळाने केलेल्या निवेदनाद्वारे २९ गावांसाठी स्वतंत्र योजना राबविण्यात यावी तसेच या गावांचा समावेश जलजीवन योजनेत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. उमदीसह २९ गावांची प्रादेशिक योजना रद्द करून सर्व गावांसाठी स्वतंत्र योजना करावी अशी मागणी जत तालुक्याच्या शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये व त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे.

जत शहराचा पाणी पुरवठ्यासाठी अमृत-२.० योजनेत समावेश करणेबाबतची कार्यवाही नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेस्तरावर करण्यात येते.
(२) उक्त प्रकरणी दिनांक ८.११.२०२३ रोजी मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता,मंत्रालय, मुंबई यांचे दालनात प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सदर बैठकीस मा. आमदार श्री. गोपीचंद पडळकर , विधान परिषद सदस्य मा. आमदार श्री. विक्रम सिंह सावंत, विधानसभा सदस्य तसेच जत तालुक्यातील २९ गावांचे सरपंच व संबंधित अधिकारी उपस्थित होते. सदरहू बैठकीत झालेल्या चर्चेनुसार जल जीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेल्या २९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील प्रस्तावित दोन्ही स्त्रोतांची तांत्रिक व्यवहार्यता व स्रोत शाश्वतता तपासणी तसेच सदर २९ गावांसाठी उपलब्ध असलेल्या गावनिहाय स्त्रोतांची पाहणी करण्यासाठी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सांगली यांच्या सनियंत्रणाखाली दोन पथके गठीत करण्यात

आली आहेत. सदरहू पथकांनी केलेल्या पाहणीनुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी शासनास तपासणी अहवाल सादर केला. तथापि सदर अहवालामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी दि. २/०४/२०२४ रोजी पुन्हा आढावा बैठक घेऊन अंतिम अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने पथकांमार्फत पुन्हा तपासणी करून शासनास अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तांबुळगाव, मुदखेड व सुपेगाव (ता.पालम, जि.परभणी) या गावातील ग्रामस्थांना शहरामध्ये जाण्यासाठी चिखलातून प्रवास करावा लागत असल्याबाबत**

**(२८) ७३८७० (०५-०३-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांबुळगाव, मुदखेड व सुपेगाव (ता.पालम, जि.परभणी) या गावातील ग्रामस्थांना रस्त्याअभावी शहरामध्ये जाण्यासाठी चिखलातून प्रवास करावा लागत असून विद्यार्थी, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरीकांसह प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता बांधण्यासाठी उक्त गावातील ग्रामस्थ सन २०१९ पासून वारंवार संबंधित अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार गावातील रस्ता त्वरीत बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार पेटपिंपळगाव ते तांबुळगाव मुदखेड सिपेगाव ते जिल्हा सरहदपर्यंत रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.३७ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ७.०० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून नादुरुस्त आहे. सदर रस्त्याचे काम सन २०२० मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि सदर रस्त्याच्या कामास मंजूरी मिळू शकली नाही. यास्तव सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना, सन २०२४-२५ च्या प्रारुप आराखड्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत समाविष्ट करण्यात आलेले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामगार कल्याण मंडळातील अर्धवेळ महिला कर्मचारी यांच्या मागण्यासंदर्भात**

**(२९) ७३९५५ (२५-०२-२०२४). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार कल्याण मंडळातील अर्धवेळ महिला कर्मचारी यांच्या मागण्यासंदर्भात सचिव व कल्याण आयुक्त यांना माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार लेखी निवेदन दिले तसेच माहे मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुद्दा उपस्थित करुन अद्यापी या संदर्भात कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात निर्णय घेण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने

कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०७-०६-२०२४) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील अर्धवेळ कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनास विविध निवेदने प्राप्त झाली आहेत.

सदरहू निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ तसेच शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोखरी व पिंपळगाव येथे ( ता.महागांव , जि.यवतमाळ ) येथे पाण्याच्या टाकीचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत

**(३०) ७४०१७ (०१-०३-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोखरी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे जलजीवन मिशनअंतर्गत पाण्याच्या टाकीचा स्लॅब दिनांक ६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास कोसळून दोन मजूर गंभीर जखमी झाल्याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी समिती नेमली असून सदर समितीने अहवाल सादर केला असल्यास अहवालात काय आढळून आले आहे,
(२) असल्यास, पिंपळगाव मुंगशी (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथेही जलजीवन मिशन योजनेच्या पाणीपुरवठा टाकीचा स्लॅब कोसळून कामगार जखमी झाल्याचे दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या तीन महिन्यांमध्ये दोन टाक्या कोसळल्या असून निकृष्ठ दर्जाच्या कामासंदर्भात जिल्हा परिषदेने कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री.मोहम्मद कुमठे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव वर्षभरापासून शासनस्तरावर पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१४-०६-२०२४) :** (१) मौ. पोखरी (ता. महागांव, जि. यवतमाळ) येथे दिनांक ०६/०८/२०२३ रोजी पाण्याच्या टाकीचे स्लॅब काँक्रिटींग सुरु असतांना काँक्रीट वर नेणाऱ्या लिफ्टचा सेंट्रीगला धक्का लागून अपघात झाला होता. त्या प्रकरणी सविस्तर चौकशी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती मार्फत करुन चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालात झालेली घटना ही निव्वळ अपघात असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) मौ. पिपळगांव मुंगशी (ता. पुसद, जि. यवतमाळ) येथील जल जीवन मिशन अंतर्गत सरु असलेल्या कामाच्या पाण्याच्या टाकीच्या स्लॅबच्या काँक्रीटींगचे काम सुरु असतांना सेंट्रींगच्या बल्ल्या जागेवरुन हलल्यामुळे सेंट्रींगचा काही भाग खाली सरकला व त्यानंतर सदर बल्ल्या काढतेवेळी संपुर्ण सेंट्रीग खाली आली. तथापि, सदर घटनेत कोणीही कामगार जखमी झालेला नाही.
(३) मौ. पोखरी, ता. महागांव व मौ. पिंपळगांव मुंगशी, ता. पुसद येथील अपघाताची सविस्तर चौकशी होऊन चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने सदर दोन्ही घटना केवळ अपघात असल्याचे अभिप्राय आले. तथापि, सदर काम करतेवेळेस योग्य ती काळजी न घेतल्याने झालेल्या घटनेस कंत्राटदार जबाबदार असल्यामुळे सदर योजनेची पुढील उर्वरीत कामे न करण्याबाबत तसेच सदर कामांची अनामत रक्कम जप्त करून, जिल्हा परिषदेअंतर्गत पाणी पुरवठा

योजनांची पुढील ६ महिन्यापर्यंत कामे न घेण्याबाबत दंडात्मक कारवाई कंत्राटदाराविरुध्द करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत कामाची नव्याने निविदा करण्याबाबत ठराव घेण्यात आलेला आहे.
(४) हे खरे नाही, पाणी पुरवठा उपविभाग पुसद उपविभागाचे उप अभियंता श्री. कुमठे यांचे निलंबनाचा प्रस्ताव वरील प्रकरणी सादर नाही, त्यांचेकडे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग महागांव येथील प्रभार व त्या दरम्यान कामासंदर्भात पाठविण्यात आलेला होता.
(५) वरील प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी मध्ये निव्वळ अपघात असल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे निष्काळजीपणाचा ठपका ठेऊन संबंधीत कंत्राटदारांकडून सदर योजनेची उर्वरीत कामे काढून घेण्यात आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कंळब (जि.धाराशिव) येथील औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील कार्यशाळेची (वर्कशॉप) मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याबाबत**

**(३१) ७४०६७ (२९-०२-२०२४). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंळब (जि.धाराशिव) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कार्यशाळा (वर्कशॉप) क्रमांक १ व २ ची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यशाळांची दुरुस्ती प्रलंबित असल्यामुळे संस्थेतील प्रस्तावित कामांस दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेच्या कार्यशाळांच्या दुरुस्तीकरिता निधी मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त कार्यशाळा दुरुस्तीस शासन निधीसह मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१०-०६-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
धाराशिव जिल्हा हा आकांक्षित जिल्हा असल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळंब येथील कार्यशाळा १ व २ च्या दुरुस्तीचे रु.३४.९० लक्ष कामाचा प्रस्ताव "अल्पसंख्याक कल्याणाकरीता प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी" करण्याच्या मार्गदर्शिकेतील सेक्शन ६ अंतर्गत सदरचे कामाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी,धाराशिव कार्यालयाकडुन जा.क्र.२०२३/सा.प्र/ संकीर्ण/ कावी दि.२८/०६/२०२३ अन्वये अल्पसंख्याक विभागास सादर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने अल्पसंख्याक विभागाच्या सुचनेप्रमाणे जिल्हाधिकारी,धाराशिव कार्यालयाने जा.क्र.२०२३/ सा.प्र/संकीर्ण/कावी दि.१०/०८/२०२३ च्या पत्रानुसार परीपुर्ण फेरप्रस्ताव कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना सादर करण्यास कळविले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद मा. जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना पुन:श्च प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने पुढील स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम हा कार्यक्रम केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राबवून अल्पसंख्याक बहुल भागात पायाभूत सुविधासाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदरचा निधी हा प्रकल्प आधारीत मंजूर केला जात असून अल्पसंख्याक समुदयास जर लाभ होत असले तरच अंतिम मंजूरी केंद्र शासनाकडून निधीची उपलब्धता लक्षात घेऊन दिली जाते. परंतु, देखभाल दुरुस्तीसाठी अल्पसंख्याक विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात नसल्याने अद्यापि निधी उपलब्ध करण्यात आला नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी अल्पसंख्याक विभागाकडून निधी उपलब्ध होत नसल्याने, कळंब (जि.धाराशिव) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कार्यशाळा (वर्कशॉप) क्रमांक १ व २ चे दुरुस्ती चे बांधकाम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येतील.

---

**सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये**
**कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) ७४२०० (०६-०३-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) येथील उप जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये केवळ एकच कर्मचारी कार्यरत असल्याने रक्त तपासणी करीता येण्या-या रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना वेळेवर तपासणी अहवाल मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रक्तपेढीत कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

उप जिल्हा रुग्णालय, सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग येथील रक्तपेढीमध्ये रक्तसंक्रमण अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार वैद्यकीय अधिकारी-गट अ यांच्याकडे देण्यात आला आहे. तसेच रक्तपेढी वैज्ञानिक अधिकाऱ्यांची ०३ पदे मंजूर असून ०१ पद नियमित तत्वावर व ०१ पद कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेले आहे.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क व गट-ड संवर्गाची पदभरती परीक्षा दि. ३० नोव्हेंबर ते १२ डिसेंबर,२०२३ या कालावधीत घेण्यात आली असून सदर परिक्षेतील गुणवत्ताधारक उमेदवारांना कागदपत्रं पडताळणीअंती नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाबाबत**

**(३३) ७४२७८ (०६-०३-२०२४). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत मिळणारा लाभ आतापर्यंत किती मातांना मिळला आहे,

(२) असल्यास, या योजनेचा लाभ मिळण्याकरिता देण्यात आलेली मुदत वाढविण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२४) :** (१) राज्यात सन २०१७ ते मार्च, २०२३ पर्यंत ३४०७६०४ इतक्या मातांना लाभ देण्यात आला आहे.

नवीन पीएमएमव्हीवाय २.० पोर्टल प्रमाणे माहे एप्रिल, २०२३ ते १ एप्रिल, २०२४ पर्यंत ३७१९९६ इतक्या मातांची नोंदणी करण्यात आली असून ९७७२७ इतक्या मातांना लाभ देण्यात आला आहे.

(२) सदर योजनेचे सर्व प्रशासकीय सनियंत्रण केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत होत असून त्या कार्यालयाकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सद्यस्थितीत केंद्र

शासनाच्या दि. १४ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार सदर योजनेची कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील आदिवासी भागातील कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांना अतिरिक्त मोबदला देण्याबाबत

**(३४) ७४२९८ (०६-०३-२०२४). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील अतिदुर्गम आदिवासी भागातील कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांना कामांवर आधारित अतिरिक्त मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा तथा विक्रमगड या अतिदुर्गम तालुक्यातील एकूण ७७ उपकेंद्रामध्ये काम करणा-या कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांना अतिरिक्त कामावर आधारित मोबदला देण्यात येतो. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | सन | शेरा |
|---|---|---|
| १. | २०२१-२२ | अदा करण्यात आला आहे. |
| २. | २०२२-२३ | केंद्र शासनामार्फत अतिरिक्त कामावर आधारित मोबदल्यासाठीचे अनुदान मंजूर करण्यात आले नव्हते. त्यास्तव आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यक्रम मंजूर कृती आराSr.No.१८८ मध्ये Saving राहणा-या अनुदानातून २०२२-२३करीता अतिरिक्त कामावार आधारित मोबदला जिल्ह्यांनी मागणी केल्याप्रमाणे देण्याकरीता ४० वी कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली आहे. सदर करीता जिल्ह्यांना मागणीप्रमाणे अनुदान देण्यात आले आहे. |
| ३. | २०२३-२४ | आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यक्रम मंजूर कृती आराखडा मधील Sr.No.१८८ (अतिरिक्त कामावर आधारीत मोबदला) मधून पालघर जिल्ह्यासाठी जव्हार, मोखाडा तथा विक्रमगड या तालुक्यामधील एकूण ७१ कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी करीता रु.१२७.८० लक्ष एवढे अनुदान देण्यात आले आहे. त्यापैकी जिल्हा स्तरावर एप्रिल ते सप्टेंबर २०२३ पर्यंतचा अतिरिक्त कामावर आधारित मोबदला अदा करण्यात आलेला आहे. |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या एकत्रित बालविकास योजनेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) ७४३०२ (०१-०३-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी बहुल पालघर जिल्ह्यात आदिवासी बालके व मातांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असूनदेखील जिल्ह्यातील महिला व बाल विकास विभागांतर्गत येणाऱ्या एकत्रित बालविकास योजनेतील महत्वाची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात कार्यान्वित असलेल्या एकूण १३ प्रकल्पांतर्गत २७९९ अंगणवाड्या येत असून त्याचे काम बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका अंगणवाडी-मिनीअंगणवाडी सेविका, मदतनीस पाहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत जिल्हयात महत्वाच्या पदांपैकी प्रकल्प अधिकारी ६ पदे, मुख्य सेविकांची ८९ मंजूर पदांपैकी २९ पदे, अंगणवाडी सेविकांची २० पदे ,मदतनिसांची ४१ व मिनी अंगणवाडी सेविकांची ३ पदे रिक्त असल्याने कामाचा अतिरिक्त भार इतर मुख्य सेविकांवर येत असल्याने अंगणवाडीचे कामकाज पाहणे, कागदपत्रे तपासणे, बालकांची वजन मापे, पोषण ट्रक ॲप चे काम यांसारखी अतिरिक्त कामे त्यांना करावी लागत असल्याने माता व बालकांच्या संपूर्ण पोषणाकडे विशेष लक्ष देता येणे शक्य नसल्याकारणाने बालके व मातांमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालके व मातांचे कुपोषण रोखण्यासाठी महिला व बाल विकास विभागांतर्गत येणाऱ्या एकत्रित बालविकास योजनेतील रिक्त पदे त्वरित भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०६-२०२४) :** (१), (२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील पदांबाबत पालघर जिल्ह्याची ग्रामीण प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बाल विकास प्रकल्प अधिकारी | १२ | ६ | ६ |
| मुख्यसेविका | ८९ | ६० | २९ |
| अंगणवाडी सेविका | २२३० | २१८८ | ४२ |
| अंगणवाडी मदतनीस | २२३० | २२०२ | २८ |
| मिनी अंगणवाडी सेविका | ५६९ | ५६८ | १ |

तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील पदांबाबत पालघर जिल्ह्याची नागरी प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बाल विकास प्रकल्प अधिकारी | ३ | १ | २ |
| मुख्यसेविका | २० | ८ | १२ |
| अंगणवाडी सेविका | ५०८ | ४८२ | २६ |
| अंगणवाडी मदतनीस | ५०८ | ५०४ | ४ |
| मिनी अंगणवाडी सेविका | ३५ | ३५ | ० |

बाल विकास प्रकल्प अधिकारी या रिक्त पदाचा कार्यभार अन्य बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आला आहे. मुख्यसेविका व अंगणवाडी कर्मचारी यांचे रिक्त पदांचे कार्यभार नजीकच्या अंगणवाडी कर्मचा-यांना देण्यात आला आहे. त्यामुळे रिक्त पदांमुळे कुपोषणाचे प्रमाण वाढले हे खरे नाही.
(४) व (५) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

## राज्यात उद्योजतकता वाढाव यासाठी शासन नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण प्रभावीपणे राबवित असल्याबाबत

**(३६) ७४३१९ (०५-०३-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जगातील बदलते तंत्रज्ञान, नव्या संकल्पना, निर्माण झालेल्या नव्या संधी, सर्व क्षेत्रात होत असलेले डिजीटलायजेशन यावर आधारित नवीन 'माहिती व तंत्रज्ञान धोरण' विकसित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरणामुळे राज्यातील उद्योजक्ता व रोजगार वाढीवर त्याचा सकारात्मक परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धोरणातून नव उद्योजकांना त्यांचा उद्योग वाढवा, लघु व मध्यम उद्योगांचा विकास व्हावा यासाठी कोणत्या सवलती शासन स्तरवरुन देण्यात आल्या आहेत,
(४) असल्यास, माहिती व तंत्रज्ञान धोरणामुळे राज्यात किती रकमेची गुंतवणूक होणार असून त्यातून किती रोजगार निर्मिती होणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
राज्यात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांच्या सर्वकष व्यापक विस्तारासाठी माहिती तंत्रज्ञान उद्याने, माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर उत्पादने, डेटा सेंटर, एव्हीजीसी तसेच नाविन्यपूर्व तंत्रज्ञान त्याचप्रमाणे एकात्मिक माहिती तंत्रज्ञान शहरे विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे. याबाबी विचारात घेऊन, सर्व समावेशक असे माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण तयार करण्यात आले असून, महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ दिनांक २७ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.
(३) नव उद्योजकांना त्यांचा उद्योग वाढावा, लघु व मध्यम उद्योगांचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ मध्ये खालील प्रोत्साहने देण्याबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत :-
१. सदर धोरणामध्ये उदयोन्मुख व नव उद्योजकांना भांडवली अनुदान, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत शुल्क माफी, वीज दर अनुदान, प्रमाण पत्रासाठी सहाय्य, भरती सहाय्य, पेटंट संबंधित सहाय्य देण्याची तरतुद करण्यात आली आहे.
२. तसेच पायाभूत सुविधा अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे डेटा सेंटर पार्ककरिता रस्ता, वीज, कनेक्टिव्हीटी, पाणी आणि इतर महत्वाच्या आवश्यक पायाभूत सुविधा पुरवतील व डेटा सेंटर पार्कला जमीन वाटप करण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व पूर्व मंजूरी / परवानग्या मिळवून देण्याचे काम करेल तसेच ट्रान्समिशन लाईन आणि सबस्टेशन संबंधित पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आवश्यक आर्थिक मदत करण्यात येईल.
३. माहिती तंत्रज्ञान उद्यानाकरिता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक व जागेच्या वापरानुसार किमान रस्ता रुंदी १२ मीटर करिता बृहन्मुंबई तसेच उर्वरित महाराष्ट्राकरिता ३ पर्यंत रस्ता रुंदी १८ मीटर असेल तर बृहन्मुंबई करिता ४ पर्यंत व

उर्वरीत महाराष्ट्राकरिता ३.५ पर्यंत तसेच किमान रस्ता रुंदी २७ मीटर असेल तर बृहन्मुंबई क्षेत्राकरिता ५ पर्यंत व उर्वरित महाराष्ट्राकरिता ४ पर्यंत चटई निर्देशांक देण्याची तरतूद धोरणात करण्यात आली आहे.

४. महाराष्ट्र शासनाव्दारे अग्रगण्य तांत्रिक संस्था, बिझनेस स्कूल आणि खाजगी संस्था यांच्या सहकार्याने स्टार्टअपला सहकार्य करण्यासाठी एक एकात्मिक सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) स्थापित करण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ- नॅसकॉम स्टार्टअप वेअर हाऊस कार्यक्रमाच्या धर्तीवर अशा एम हब व्दारे नावीन्यपूर्व क्लस्टर विकसित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ज्यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा उगम, भांडवल, कौशल्य आणि गुणवत्ता या आधारे नवीन उद्योगांचा विकास तसेच व्यवसाय करण्यासाठीच्या नवीन पध्दतींना प्रोत्साहन देण्यात येईल.

महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे M-Hub हे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी "राज्य शिखर संस्था" (State Apex Institute) म्हणूनही काम करेल. त्यानुसार कळंबोली, जिल्हा-रायगड येथे महाराष्ट्र राज्य लघु औद्योगिक विकास महामंडळाच्या (MSSIDC) जमिनीवर त्याची स्थापना केली जाणार आहे. ही एक अत्याधुनिक इमारत असेल ज्यामध्ये ३०० विद्यार्थ्यांकरिता प्रशिक्षण सुविधा असतील तसेच त्यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक / शैक्षणिक कर्मचाऱ्यांसाठी निवासाची व्यवस्था देखील असेल.

(४) व (५) राज्यात माहिती तंत्रज्ञान आणी माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणामध्ये रु. ९५,००० कोटी नवीन गुंतवणूक आकर्षित करणे. राज्यात माहिती तंत्रज्ञान आणी माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रात ३.५ दशलक्ष एवढया नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणे, उच्च रोजगार क्षम, प्रतिभावान व गुणवत्ता पूर्ण मनुष्यबळ विकसित करण्याकरिता कौशल्य वृध्दीमध्ये प्रतिवर्ष १५ टक्के एवढी वाढ करणे, राज्यात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रातून रु. १० लक्ष कोटी एवढया निर्यातीचे लक्ष साध्य करण्याचे महत्वाकांक्षी उद्दीष्ट धोरणात अंतर्भूत करण्यात आले आहे.

---

## गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील नवीन पाणी पुरवठा योजनेबाबत

**(३७) ७५२२९ (२९-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील नवीन पाणी पुरवठा योजनेस एकूण किती निधीची तरतूद शासनाने केली आहे त्यापैकी किती निधी कोणकोणत्या कामांवर खर्च करण्यात आला याबाबतची निविदा केव्हा काढण्यात आली व त्याचे कॉन्ट्रॅक्ट कोणाला देण्यात आहे,

(२) असल्यास, सदर योजनेच्या पाणी पुरवठ्याचा उद्गम (Water Source) व स्टोरेज टाक्यांचे काम पूर्ण झाले आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त योजना केव्हा मंजूर झाली याबाबतचे सर्वेक्षण कधी केले व सर्वेक्षण करताना प्रत्यक्ष जागेवर संबंधित अभियंता श्री.पवार व इतर अधिकारी हजर होते काय, तसेच किती लाभार्थी ग्रामस्थ हजर होते, ज्यांच्या जागेतून ही पाईपलाईन जाते त्या शेतकऱ्यांची परवानगी घेण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर गावाची पाणी पुरवठा योजना राबविण्याआधी योजनेचे डिझाईन, योजनेचे एकूण मूल्य तसेच त्यानुषंगिक माहिती ग्रामसभेस दिली होती काय, माहिती दिली असल्यास ती कोणत्या जबाबदार अधिकाऱ्यांनी दिली, सदर ग्रामसभा कोणत्या तारखेला, कोणत्या वर्षी झाली व या योजनेस ग्रामसभेने मान्यता दिली आहे काय,

५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने यापूर्वीची जुनी नळपाणी पुरवठा योजना अपूर्ण असताना नविन पाणी पुरवठा योजना एकतर्फी राबवून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडविल्याप्रकरणी अभियंता श्री.पवार व संबंधित अधिकारी तसेच ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०६-२०२४) :** (१) जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत मौजे गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. १,०६,९५,२५७/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्याता देण्यात आली आहे. सदर योजनेची निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन, मे. समीर अशोक वेखेंडे, मु.मोज, ता. वाडा या ठेकेदारास दिनांक ०९.११.२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीमध्ये सदर योजनेवर रु. २३.४८ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(२) योजनेचा उद्भव हा शाश्वत उद्भव असून, उध्दरण वाहीनी व वितरण व्यवस्थेचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. तसेच दोन उंच साठवण टाक्या आणि दोन उद्भवांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) मौजे गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) नळ पाणी पुरवठा योजनेस दिनांक २८.०९.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. योजनेचे सर्वेक्षण मे-२०२२ मध्ये करण्यात आले असून योजनेचे सर्वेक्षण करतांना श्री. एस.आर.पवार, उपअभियंता, संबंधित शाखा अभियंता, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे कर्मचारी व २०-२५ ग्रामस्थ उपस्थित होते. या योजनेचे सर्वेक्षण मे. शीरीन इंटरप्रायजेस, पुणे या त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात आलेले आहे. पाईपलाईन ही रस्त्याच्या कडेने असल्याने शेतकऱ्यांची परवानगी घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर योजनेची माहिती दिनांक ०३.११.२०२३ रोजी झालेल्या ग्रामसभेत देण्यात आलेली आहे. तसेच योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्यानंतर, त्यास विहीत प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सविस्तर अहवालाची प्रत ग्रामपंचायतीस देण्यात आलेली आहे. त्यानुसार ग्रामसभा ठराव क्र. ०५, दिनांक २४.०४.२०२२ अन्वये या योजनेस ग्रामपंचायत, गुहीर यांनी मान्यता दिली आहे.

(५) सन २००५-०६ या वर्षात वर्धित वेग कार्यक्रमातंर्गत मंजूर नळ पाणी पुरवठा योजना ही दरडोई ४० लि. निकषावर आधारीत होती. आत्ता जल जीवन मिशन मार्गदर्शक तत्वानुसार दरडोई ५५ लि. प्रतिदिन प्रमाणे प्रत्येक घराला पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने योजना आखण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भव नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धाड, चांडोल व इतर गावे पाणी पुरवठा योजनेंतर्गत मंजूर असून अद्यापी योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३८) ७५२५१ (२९-०२-२०२४). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाड, चांडोल व इतर गावे पाणी पुरवठा योजने अंतर्गत दहा ते बारा वर्षांपासून मंजूर असून अद्यापी सदर योजनेचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीवरुन जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांनी दिनांक २९ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास बैठक घेऊन काम सुरु करणेबाबत सूचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने योजनेची प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मौजे धाड, देऊळघाट, करडी, गिरडा. चौथा, चांडोळ व बोरखेड या ७ गावांकरिता सन २००९-२०१० मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. NRDWPअंतर्गत असलेल्या योजनेची ४० lpcd प्रमाणे ९८ टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. तद्नंतर सदर योजना

दिनांक २५.०५.२०२२ रोजी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आली असून, ५५ lpcd प्रमाणे पाणी पुरवठा करण्याचे नियोजित आहे. सदर योजनेचे काम ३५ टक्के पुर्ण झालेले असून, उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, बुलढाणा यांचे मार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन चौकशी करण्यात आली आहे. चौकशी नंतर NRDWP अंतर्गत शिल्लक असलेली कार्यान्वयनाची कामे, निधी शिल्लक नसल्याने व सु-सुधारित योजना मंजुर झालेली नसल्यामुळे जल जीवन मिशनच्या योजनेतून करण्यात येत असून, त्याद्वारे NRDWP ची योजना किरकोळ शिल्लक कामे पूर्ण करुन कार्यान्वित करण्यात येत आहे

NRDWP अंतर्गत जु न्या योजनेची किरकोळ कामे जल जीवन मिशन अंतर्गत प्रगतीत असलेल्या योजनेच्या कंत्राटदारांकडून पूर्ण करुन घेऊन योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीपुरवठा विभागांतर्गत विहिरींची कामे करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याबाबत

**(३९) ७५४६० (२९-०२-२०२४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत शहापूर तालुक्यातील २० विहिरींची कामे करणाऱ्या ठेकेदारावर शासकीय तंत्रनिकेतन बांद्रा मुंबई येथून बनावट चाचणी अहवाल प्रकरणी गुन्हा दाखल केल्याचे सन २०२२ - २०२३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत तत्कालीन कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांनी ठेकेदारास पाठीशी घालण्याकरिता अशा प्रकारचे बनावट अहवाल जोडण्यात आले होते काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०६-२०२४) :** (१) होय, हे ख्ररे आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) बनावट चाचणी अहवाल प्रकरणी संबंधित ठेकेदारांवर गुन्हे नोंदविलेले आहेत. सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा, ठाणे यांचे मार्फत चौकशी सुरु आहे. सदर प्रकरणी संबंधित तत्कालीन शाखा अभियंता व आरेखक यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येलकी (ता. अचलपूर, जि. अमरावती) या गावास जोडणाऱ्या येलकी - पूर्णानगर रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत

**(४०) ७५६६९ (११-०३-२०२४). :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येलकी (ता. अचलपूर, जि. अमरावती) या गावास जोडणाऱ्या येलकी- पूर्णानगर ग्रामीण मार्गावर १३१ हा रस्ता पुराच्या पाण्याने संपूर्ण वाहून गेल्याने ग्रामस्थांना पायी चालणे सुद्धा अशक्य झाले असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या मार्गावर असलेल्या पुलावरील मलबर देखील पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने या गावाचा संपर्क मुख्य रस्त्याशी तुटला असल्याने सदर मार्ग पूर्ववत सुरू होण्याच्या दृष्टीने याची दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ते व पूल दुरुस्ती परीक्षण कार्यक्रम (गट ब) अंतर्गत येलकी- पूर्णानगर सा. क्र. ०/०० ते २/००

ग्रा.मा. १३१ (ता. अचलपूर जि. अमरावती) रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी , जि.प. अमरावती यांचा कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन यांच्याकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून सदर प्रस्तावास निधीसह मान्यता देणेबाबत शासनाने काेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

येलकी-पूर्णानगर ग्रामा-१३१ रस्ता माहे जुलै, २०२३ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) येलकी-पूर्णानगर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१३१ दर्जाचा असून एकूण लांबी २.०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून माहे जुलै, २०२३ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता मोठ्या प्रमाणात क्षतिग्रस्त झालेला आहे.

सदर रस्त्याचे काम अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रमांतर्गत घेण्याबाबत जिल्हा परिषद, अमरावती यांचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. तथापि सदर प्रस्तावास सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मंजूरी मिळू शकली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनायाची भरती प्रक्रिया रखडल्याबाबत

**(४१) ७६४४४ (२९-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व्यवसाय व प्रशिक्षण संचालनाच्या वतीने ७७२ पदांकरिता माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास परिक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रलंबित भरती प्रक्रियेला गती मिळणेकरिता उमेदवारांकडून वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने भरती प्रक्रियेला गती देवून कागदपत्रांच्या पडताळणीकरिता पात्र उमेदवारांना बोलविण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२४-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत शासकीय संस्था व कार्यालयातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क मधील सरळसेवेची एकूण ७७२ पदे भरण्याकरिता दि. १७/०२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दि. १६/०४/२०२३ रोजी सामाईक परीक्षा (CBT -१) आयोजित करुन त्याचा निकाल दि. २३/०५/२०२३ रोजी घोषित करण्यात आला. सदर निकालानुसार कनिष्ठ सर्वेक्षक तथा कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार, अधीक्षक (तांत्रिक), मिलराईट मेंटेनन्स मेकॅनिक, वसतीगृह अधीक्षक, भांडारपाल, सहायक भांडारपाल व वरिष्ठ लिपिक यांना दिनांक १९/०१/२०२४ व दिनांक १५/०३/२०२४ रोजी नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

तसेच सदर जाहिरातीमधील निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाकरिता व्यावसायिक चाचणी (CBT-२) असून, केंद्र तसेच राज्य शासनाच्या अन्य विभागाच्या परीक्षांमुळे व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता टीसीएस यांचेकडे डिसेंबर, २०२३ पर्यंत स्लॉट उपलब्ध नसल्याने निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाची

व्यावसायिक चाचणी (CBT-२) दिनांक २१/०१/२०२४ रोजी घेण्यात आली व उत्तर तालिका दिनांक १४/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) यामध्ये किमान ४५ टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी व निवडसूची तयार करुन निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरी (ता. केज, जि. बीड) या गावाला प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळणेबाबत**

**(४२) ७६५२४ (२०-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावळेश्वर व उमरी (ता. केज, जि. बीड) या दोन्ही गावांचे ग्रामपंचायत कार्यालय एकत्र होते व प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ दोन्ही गावांना मिळत होता, मात्र उक्त दोन ग्रामपंचायती विभक्त झाल्यापासून उमरी गावाला सदर योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमरी या गावाला प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केज तालुक्यातील सावळेश्वर व उमरी या दोन्ही ग्रामपंचायती पुर्वी ग्रुप ग्रामपंचायत असल्याने, त्यांचे आवास प्लस सर्वेक्षण प्रपत्र-ड मध्ये एकत्र नोंदणी झाली होती. सद्यस्थितीमध्ये कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) मधील लाभार्थ्यांना मंजुरीचे काम पूर्ण झाले आहे व सन २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या उद्दिष्टानुसार आवास प्लस यादीमधून लाभार्थी मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सन २०२१-२२ मध्ये केंद्र शासनामार्फत आवास सॉफ्टद्वारे ग्रामपंचायत निहाय उद्दिष्ट वाटप करण्यात आले त्यावेळी सावळेश्वर व उमरी या ग्रामपंचायती विभक्त झालेल्या नव्हत्या. तद्नंतर सदर ग्रामपंचायती विभक्त झालेल्या आहेत. केंद्र शासनाकडून पुढील वर्षीचे उद्दिष्ट वितरीत झाल्यानंतर नियमानुसार आवास सॉफ्ट (Awaas Soft) द्वारे सावळेश्वर व उमरी या दोन्ही ग्रामपंचायतींना उद्दिष्ट वाटप होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आयटीआय मध्ये निदेशकांची सुमारे ५० टक्केपेक्षा जास्त पदे रिक्त असल्याबाबत**

**(४३) ७६८४१ (०८-०५-२०२४). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४१९ आयटीआय मध्ये निदेशकांची सुमारे ५० टक्केपेक्षा जास्त पदे रिक्त असून यासर्व रिक्त पदांवर तासिका निदेशक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निदेशकांना आयटीआयमध्ये तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेवून या मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत निदेशकांच्या नियमित ६०२६ मंजूर पदांपैकी ३६७६ पदे भरलेली असून २४५५ (४०.७४%) पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी १९२४ पदांवर तासिका तत्वावर निदेशक कार्यरत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) तासिका तत्वावरील निदेशकांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेबाबत मागणीच्या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दिनांक १४.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात नवीन उद्योग आणण्याबाबत**

**(४४) ७७२९३ (०५-०३-२०२४). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील काही महिन्यांपासून अनेक उद्योग गुजरात वा अन्य राज्यात गेले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यमान सरकारने जुन्या उद्योगांना नवीन उद्योग म्हणून दाखवून नागरिकांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात किती नवीन उद्योग माहे जुलै, २०२२ पासून आजतागायत आले आहेत, किती उद्योगांशी सामांजस्य करार केला आहे व थेट परकीय गुंतवणूक किती करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तदनुषंगाने राज्यात नवीन उद्योग आणण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा दरम्यान उद्योग विभाग अथवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांशी सामंजस्य करार केलेला एकही मोठा उद्योग प्रकल्प परराज्यात गेलेला नाही.
(३) दावोस,स्वीत्झर्लंड येथे जानेवारी २०२३ मध्ये आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत शासनाने विविध कंपन्यांसोबत १.३७ लाख कोटी रकमेचे १९ गुंतवणुक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या असून, त्यापैकी ८० टक्के प्रकल्प अंमलबजावणीच्या प्रगती पथावर आहेत. सदर प्रकल्पाद्वारे राज्यात अंदाजे १ लक्ष एवढी रोजगार निर्मिती होणार आहे.
तसेच दावोस, स्वीत्झर्लंड येथे जानेवारी २०२४ मध्ये आयोजित जागतिक आर्थिक परिषदेमध्ये उद्योग विभागामार्फत २३ कंपन्यासोबत रूपये २,९८,७९१/- कोटीचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्याद्वारे राज्यात अंदाजे १,७९,७८० एवढी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.
DPIIT (Department for Promotion of Industry and Internal Trade) FDI फॅक्टशीट नुसार महाराष्ट्र राज्यामध्ये ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२४ या कालावधीमध्ये रुपये ५,३२,४२९ कोटी एवढी थेट विदेशी (FDI) रकमेची गुंतवणुक झाली आहे. त्यापैकी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्यामध्ये रु.१,२५,१०१ कोटी एवढी परकीय गुंतवणुक करण्यात झाली असून, ती देशाच्या एकूण गुंतवणूकीच्या ३०% आहे. महाराष्ट्र राज्य हे परकीय गुंतवणूकीमध्ये देशात प्रथम क्रमांकावर आहे.
(४) महाराष्ट्रामध्ये देशातील बहुतेक प्रमुख उद्योगांची मुख्यालये असल्यामुळे अनेक राज्यांचे मुख्यमंत्री/मंत्री अधिकाऱ्यांसमवेत येऊन उद्योजकांना आपल्या राज्यात गुंतवणूक करण्याचे आवाहन करतात. तथापि, महाराष्ट्रामध्ये असलेले उद्योग पुरक वातावरण, अद्यावत औद्योगिक पायाभूत सुविधा, प्रगत आद्योगिक धोरण, सामुहिक प्रोत्साहन योजना, क्षेत्र निहाय विशेष औद्योगिक धोरणे तसेच EoDB (Ease of Doing Business) अंतर्गत मोठ्या

गुंतवणुकदारांना मार्गदर्शन तसेच गुंतवणुकीबाबत सर्वोतोपरी सहाय्य करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले रिलेशनशीप मॅनेजरर्स व रिलेशनशीप एक्झीक्युटीव्ह तसेच प्रमुख विदेशी गुंतवणुकदारांना सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले समर्पित विदेश कक्ष, एक खिडकी योजना इत्यादींमुळे तयार झालेले गुंतवणूकस्नेही वातावरण यामुळे महाराष्ट्रातून इतर राज्यांमध्ये उद्योग स्थलांतरीत होणार नाहीत याची दक्षता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व राज्य शासनामार्फत घेतली जाते. त्यामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रात जास्तीत जास्त गुंतवणूक होवून, मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्याकरीता राज्य शासनाकडून निरंतर व ठोस प्रयत्न करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हयात खाजगी रुग्णालय व खाजगी डॉक्टराकडून रुग्णांची होणारी लूट थांबविण्याबाबत

**(४५) ७७२९५ (११-०३-२०२४). :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात सर्दी, ताप, खोकला, हगवण, उलटी,आदी मोठया प्रमाणात व्हायरल फ्लूच्या साथीमुळे शासकीय रुगणालयात रुग्णांना मोफत उपलब्ध होणारी सलाइनसाठी खाजगी रुग्णालय व तेथील डॉक्टर रुपये पाचशे इतके घेत असल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी रुग्णालय व खाजगी डॉक्टरांकडून रुग्णांची होणारी लूट थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या नगर पंचायत /नगरपालिका क्षेत्रामधील महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यांतर्गत नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांचे बाबतीत तक्रार निवारण कक्षास तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि. पुणे) तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचा स्त्रोत बदलणेबाबत

**(४६) ७७७८० (०१-०३-२०२४). अ‍ॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत सुमारे ६९ महसुली गावांमध्ये पेयजल पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये नदीकाठावरील अनेक गावांसाठी कोणत्याही प्रकारे पाणी तपासणी न करता पाण्याचा स्त्रोत म्हणून नदीचे पाणी घेण्यात येणार असल्याची शिफारस करण्यात आली असून, त्यामध्ये स्वामी चिंचोली या गावाचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पाण्याचा स्त्रोत बदलण्यात यावेत अशी मागणी मा. लोकप्रतिनिधी यांनी माहे मे - जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या बैठकांमध्ये करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने स्वामी चिंचोली व इतर गावातील पाणी पुरवठा योजनेचा स्त्रोत बदलणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

दौंड तालुक्यात एकुण ७९ योजना राबविण्यात येत असून, त्यापैकी ५६ योजना जिल्हा परिषदमार्फत राबविण्यात येत आहेत व एर्वीरित २३ योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविण्यात येत आहेत.

(२) दौंड तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत नदीकाठी खानोटे, राजेगाव, वाटलुज, लोणारवाडी या गावांची योजना जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित आहेत. सदर गावाचा उद्भव हा भिमा नदी घेणेत आलेला आहे. सदर योजनेकरिता पाणी तपासणी अहवाल घेणेत आलेला होता. परंतु, ग्रामपंचायत मार्फत स्त्रोत बदल करणेबाबत मागणी करणेत आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वामी चिंचोली, मलठण व देऊळगावराजे या गावांच्या योजनांचे स्त्रोत भिमा नदीकाठी आहेत. भिमा नदीच्या पाण्याचा रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त करून घेण्यात आलेला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) ग्रामपंचायतच्या स्त्रोत बदल मागणीनुसार आवश्यक तांत्रिक बदल प्रस्ताव तयार करणेची प्रक्रिया जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे. तसेच स्वामी चिंचोली या गावाबाबत योजनेच्या देखरेख व व्यवस्थापनासाठी नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी मंजूर योजनेत घेतलेल्या अस्तित्वातील उद्भवाच्या पाण्याची तपासणी केली असून, प्राप्त अहवालाप्रमाणे सदरील उद्भवाचे पाणी जलशुध्दीकरण करून वापरण्यास हरकत नाही. असे नमुद केले आहे. सबब, स्त्रोत बदलणेबाबतची मागणी रद्द करणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ग्रामपंचायतीस कळविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील जल जीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या विस्कळीत नियोजनामुळे अंदाजपत्रके चुकल्याबाबत

**(४७) ७७७८१ (२९-०२-२०२४). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील जल जीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या विस्कळीत नियोजनामुळे अनेक गावातील पाणी पुरवठा योजनांची अंदाजपत्रके चुकल्याने पुन्हा सर्वेक्षण करून नव्याने अंदाजपत्रके सादर करावी लागली असल्याची बाब माहे जून - जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंदाजपत्राकांमध्ये सुधारणा करुन पाणीपुरवठा योजनांना नव्याने मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त विस्कळीत नियोजन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यामध्ये जल जीवन मिशन अभियानांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत २८ महसुली गावांमध्ये एकूण २३ पेयजल पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे तसेच जिल्हा परिषदेमार्फत ५६ महसुली गावांमध्ये एकूण ५६ पेयजल पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची अंदाजपत्रके व आराखडे हे शासनाने नेमून दिलेल्या पीएमसी यंत्रणामार्फत तयार करून घेण्यात आली आहेत. तथापि काही ग्रामपंचायतींनी योजनेमध्ये बदल करून मिळण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागण्यांची शहानिशा करून या मागण्यांची व्यवहार्यता तपासण्यात येत आहे. तसेच ग्रामपंचायतीने केलेल्या मागण्या तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्यास आवश्यक ते बदल करून सुधारित अंदाजपत्रके आराखडे तयार करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (ता.हवेली, जि.पुणे) गावास जल जीवन मिशन अंतर्गत नवीन नळपाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत

**(४८) ७७८५५ (२९-०२-२०२४). अॅड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (ता.हवेली, जि.पुणे) या गावाची लोकसंख्या सुमारे आठ हजार पर्यंत असून सद्य:स्थितीत अस्तित्वात असणारी नळपाणीपुरवठा योजना अपुरी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अस्तित्वातील उद्भव कमी पडत असल्याने शाश्वत उद्भव विचारात घेवून योजना तयार करणेबाबत ग्रामपंचायत, नायगांव यांनी पाणीपुरवठा विभागाला पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त गावास जलजीवन मिशन अंतर्गत नवीन नळपाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१३-०६-२०२४) :** (१) नाही.

(२) दि. ११.०८.२०२३ रोजी ग्रामपंचायतीमार्फत नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये उद्भव विहीर, पंपघर, सौरऊर्जा पॅनल, जलशुध्दीकरण केंद्र व वितरण नलिकेव्दारे मिटर बसविणे इत्यादी बाबींची मागणी उप अभियंता, हवेली यांचेकडे करण्यात आलेली आहे.

(३) जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अस्तित्वातील विहीर उद्भव विचारात घेवून राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पुर्ण करणेत आलेल्या विहीर, उंच टाकी, दाबनलिका इ. कामे विचारात घेवून वितरण नलिका प्रस्तावित करून सदरचे काम पुर्ण करणेत आलेले आहे.

(४) लागू नाही.

---

## राज्यातील उद्योग धोरण कमकुवत ठरल्याने निर्यातीचा वाटा अत्यल्प झाल्याबाबत

**(४९) ७७९७४ (०५-०३-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योग धोरण कमकुवत ठरल्याने राज्य निर्यात सज्जता निर्देशांक यादीत तमिळनाडू, गुजरात राज्यानंतर मागे पडल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्यात क्षेत्र, विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करण्यास अपयशी, उद्योगधंद्यांना पुरेशी वीज पुरवठा न होणे, उद्योग स्थापन करण्यास अनेक परवानग्या लागणे तसेच थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यास मागे पडल्याने राज्यातील निर्यातीचा वाटा एकूण १७.३३ टक्क्यांनी घसरुन फक्त ७२ अब्ज डॉलर्स इतका कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्योगधंदे वाढविण्याबाबत शासन गंभीर नसल्याने शेजारील राज्यातील निर्यातीमध्ये वाढ ६३ अब्ज डॉलर्सवरुन १२७ अब्ज डॉलर्सपर्यंत गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्रुषंगाने राज्यांची झालेली पीछेहाट थांबवून निर्यातक्षमता वाढविणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही,

नीति आयोगामार्फत करण्यात येणा-या निर्यात सज्जता निर्देशांकामध्ये महाराष्ट्र राज्य सन २०२० ते २०२२ या तीन वर्षामध्ये सलग दुस-या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. सदर निर्देशांकाच्या मुल्यमापनामध्ये निर्यात परिसंस्थेच्या माप

दंड मध्ये महाराष्ट्र हे राज्यातील आघाडीचे राज्य ठरले आहे.

महाराष्ट्र राज्याने सन २०२२ च्या मानांकनामध्ये ७८.२ असे गुण प्राप्त केले आहेत. हे गुण मागील दोन वर्षाचे म्हणजेच EPI २०२१ (७७.१४) आणि EPI २०२० (७५.१४) या गुण रँकिगच्या तुलनेत (स्कोअर) अधिक आहेत.

(२) हे खरे नाही,

सन २०२०-२१ मध्ये रुपये ५,४५,०८४ कोटी, सन २०२१-२२ मध्ये रुपये ५,८१,४३९ कोटी व सन २०२३ ते जानेवारी, २०२४ पर्यंत रुपये ४,५३,८२९ कोटी इतकी निर्यात झाली आहे. सदर निर्यातीच्या प्रमाणात दरवर्षी सातत्याने वाढ झालेली आहे.

रिझर्व्ह बँक व डीपीआयआयटी च्या अहवालानुसार राज्य थेट परकीय गुंतवणुकीमध्ये अग्रेसर असून ऑक्टोंबर, २०१९ ते डिसेंबर २०२३ पर्यंत राज्यामध्ये रुपये ५,०५,३०५ कोटी इतकी थेट विदेशी गुंतवणूक प्राप्त झाली आहे. सदर कालावधीत थेट विदेशी गुंतवणूकीमध्ये महाराष्ट्र हे प्रथम क्रमांकाचे राज्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) निर्यात क्षेत्राचा विस्तार करुन, निर्यात वाढ दर दुप्पट करण्यासाठी राज्याचे पहिले निर्यात प्रोत्साहन धोरण -२०२३ दि. २२/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आले आहे. राज्य शासनाने निर्यातदारांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांची वाढ सुलभ करण्यासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवले आहेत

निर्यात वृध्दीसाठी प्रत्येक जिल्ह्याचा वार्षिक आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यातून निर्यात वाढीसाठी निर्यातक्षम उत्पादने, देश, निर्यातक यांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. निर्यातीसंबंधी विविध देश स्तरावरील तज्ज्ञ, संस्था यांचेशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्याशिवाय राज्य पातळीवरील विविध संस्था जसेकी EPC, DGFT यांचेमार्फत निर्यातकांना मार्गदर्शन प्राप्त होत आहे. राज्यातील निर्यातक हे राज्य-देशपातळीवरील विविध प्रदर्शनांमध्ये सहभाग नोंदवित आहेत. निर्यातकांच्या सोयीसाठी वित्तीय संस्थांकडून सहाय्य प्राप्त करणेसाठी समन्वय साधण्यात येत आहे. विविध देशाचे वाणिज्य दुतावास यांचेशी संपर्क साधून निर्यात बाजारपेठ वृध्दीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जिल्हास्तरावर निर्यातकांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदुरी (ता. कळवण जि. नाशिक ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर गैरहजर राहत असल्याबाबत**

**(५०) ७८२०९ (११-०३-२०२४). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरी (ता. कळवण जि. नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जवळपास १५ ते २० कर्मचारी व डॉक्टर यांची नेमणूक केलेली असतांना देखील येथे डॉक्टर व इतर कर्मचारी कायम गैरहजर राहत असल्याने नागरिकांना आरोग्य सुविधा मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले अर्धपीठ नांदुरी येथे पूर्ण राज्यातून भाविक दर्शनासाठी येत असून गडावर काही गंभीर अपघात झाल्यास अपघातींना तातडीने उपचार मिळण्याच्या अनुषंगाने सदर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची निर्मिती केलेली असताना देखील या केंद्रात कायम डॉक्टर व कर्मचारी उपस्थित राहत नसल्याने येथील सरपंच व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार गैरहजर असणारे डॉक्टर व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय.

प्राथमिक आरोग्य केंद्र, नांदुरी, ता. कळवण येथील संबंधित वैद्यकीय अधिकारी यांची चौकशी अहवालामध्ये दोषी आढळून आल्याने त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.